SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज


संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

तृप्त व्हावेत सकलजण.. हीच इच्छा मनोमन..
नगरची अस्सल गुजराथी थाली
४० वर्षांपासून आपल्या सेवेत..
आता आणखी एक थाळी सोबत नवीन थाळी...
फॅमिली करिता स्वतंत्र व्यवस्था..
Home Delivery Via zomato Swiggy
गुजराथी थाळी
(दर बुधवारी व रविवारी)
दाल बाटी चुरमा थाळी...
पार्सल सुविधा उपलब्ध
उपाध्याय बंधू यांचे
गुजराथ भोजनालय
जुना कापडबाजार, खिस्तगल्ली, पहिला मजला अहिल्यानगर, फोन : 8888164222
शाखा- इंदौर * धुळे * मालेगांव * नाशिक

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. २८.०८.२०२६ | अंक नं. १२७ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020

सुवर्णबंध हे बहिण-भावाच्या नात्याचे..

खास रक्षाबंधनानिमित्त सोन्या-चांदीच्या राख्या आकर्षक पॅकिंगमध्ये उपलब्ध.
सोन्याची राखी - ₹ 999/- पासुन
चांदीची राखी - ₹ 199/- पासुन
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
बुधवार चालु
22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी..
₹999/-*
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी

# मनोज जरांगे यांचे २९ ऑगस्टपासून अंतरवाली सराटीत निर्णायक आंदोलन

**मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री शिंदे, विखे पाटील यांच्यावर जोरदार हल्ला**



अंतरवाली सराटी - कुणबी प्रमाणपत्र रद्द झाल्याच्या तक्रारींवरुन राज्यातील वातावरण पुन्हा एकदा तापले आहे. मनोज जरांगे पाटील २९ ऑगस्ट रोजी अंतरवाली सराटी येथे आंदोलन करण्याच्या निर्णयावर ठाम असून, आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी मराठा समाजाला मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. आळस झटकून टाका, पेटून उठा आणि घराबाहेर पडा, अशा आक्रमक शब्दांत त्यांनी समाजाला आंदोलनासाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि समिती अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर कडाडून हल्ला चढवला.

मनोज जरांगे म्हणाले, संध्याकाळपर्यंत बघू काय होतंय. कुणीतरी आपल्याला भेटायला येईल या आशेवर समाज मोठा होत नसतो. माझं मराठा समाजाला आवाहन आहे. विखे पाटलांनी काल संभाजीनगरला आढावा घेतला. त्यांनी सांगितलं की अर्ज नाहीये. तुम्ही अर्ज दिलेले माहितीय मला, पण ते आपल्यालाच उलटं बदनाम करतायत. मराठ्यांमध्ये उदासीनता आहे असं ते म्हणतायत. ते आपल्याला हिणवतायत. तुम्ही घरात बसून राहू नका, बाहेर पडा आपल्या लेकरा-बाळांसाठी. मी वारंवार तुम्हाला सांगतोय, मुलांचं वाटोळं करू नका. आपल्यातला आळस, मरगळ सगळी झटकून टाका. ज्या मराठ्यांनी अर्ज दिले पण जे स्वीकारले गेले नाहीत त्यांनी या. ज्यांची नोंद सापडली त्यांना कुणबी प्रमाणपत्र मिळालं नाही त्यांनी या, असे आवाहन त्यांनी मराठा समाजाला केले.

मनोज जरांगे पुढे म्हणाले की, म्हणाले, संध्याकाळपर्यंत बघू काय करतात काही नाही ते, आम्ही आमच्या निर्णयावर ठाम आहोत. ज्यांना भेटायचं ते येतील, माझी क्षमता आहे. २९ ऑगस्टच्या आंदोलनामध्ये एकही गोष्ट मागे ठेवणार नाही. देवेंद्र फडणवीस जसे सांगतात तसं विखे बोलत आहेत. ते सांगत आहेत मराठ्यांमध्ये उदासीनता आहे. ज्यांची नोंद सापडली तरी अधिकाऱ्यांनी कुणबी प्रमाणपत्र दिले नाहीत किंवा अर्ज घेतला नाही त्यांनी अंतरवालीमध्ये या.

आताच चान्स आहे. पाऊस-पाणी नाही, नोकरी नाही. किमान शेतात काही पिकलं नाही तर नोकरीत काहीतरी मिळेल. विखे यांना हे दिसत नाही. कलेक्टरला घेऊन बसतात. मी त्यांना सांगितलं होतं, तुम्ही कलेक्टरला घेऊन न बसता तहसीलदारांना घेऊन बसा. तुम्ही एसडीएमला आणि जात पडताळणी अधिकाऱ्याला घेऊन बसा. विखे तुम्ही पागल झालात की मराठे तुम्हाला पागल करायचे आहेत, इथे तुम्ही शहाणे व्हा. मराठे चिडले तर विखे, फडणवीस, शिंदे तळतळाट घेऊ नका. असेही जरांगे म्हणाले.

### गूळ निघाला की ढेकळ निघाला एवढंच कळतं

विखे पाटील यांच्या कार्यपद्धतीवर टीका करताना जरांगे म्हणाले, त्यांना काहीच माहित नाही. त्यांना काहीच कळत नाही. त्यांना कारखाना, त्यातून साखर बारीक का जाड निघाली, गूळ निघाला की ढेकळ निघाला एवढंच कळतं, असे त्यांनी म्हटले. बावनकुळे यांनी केलेल्या एका दाव्याचाही जरांगे यांनी उल्लेख केला. बावनकुळे २२ लाख म्हटले. यांना विचारलं तर एवढे नसतील ते म्हणाले. अन् तुम्हाला मराठ्यांचा देव व्हायचं? इथे तुम्हाला मराठ्यांच्या उपसमितीचा अध्यक्ष केलं. तुम्ही किती वेड्यात काढणार, किती फसवणार आहात? असा सवाल त्यांनी केला.

### नाहीतर तुमच्या हातात अधिकार राहणार नाहीत

नोंदी ५८ लाख आम्ही शोधल्यात. हे मीडियासमोर आम्ही वदवून घेतले होते. यांना ५८ लाखांमधील नोंदी कमी करायच्या आहेत, असा आरोप जरांगे यांनी केला. विखे पाटील, उदय सामंत, शंभूराज देसाई, लाड भाऊ, तुम्ही सावध व्हा. चांगला, योग्य जीआर मराठ्यांना देऊन टाका. नाहीतर तुम्हाला अधिकारामध्ये आम्ही ठेवणार नाही. नाहीतर तुमच्या हातात अधिकार राहणार नाहीत, असा इशारा देखील मनोज जरांगे यांनी दिला. मुंबईतील आंदोलनाबाबतही त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. संभ्रम ठेवत नाही. २९ ऑगस्टला अंतरवालीमध्येच आंदोलन होणार. यांनी दिलं नाही तर मुंबईत होणार. पाच टप्प्यात सहा कोटी मराठा मुंबईत जाणार, असा दावा त्यांनी केला.

# मुख्य जलवाहिनी फुटल्याने नगर शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत

नगर - महापालिकेची शहर पाणी वितरण व्यवस्थेतील ७०० एम. एम. व्यासाची मुख्य जलवाहिनी २८ ऑगस्ट रोजी पहाटे अहिल्यानगर - छत्रपती संभाजी नगर रोडवर पोलीस अधिक्षक निवास स्थाना समोरील ठिकाणी तडा जाऊन फुटल्याने उपनगर भागाचा पाणी पुरवठा विस्कळीत झाला आहे.

महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने फुटलेल्या जलवाहिनीच्या तातडीने दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे. परंतु फुटलेल्या पाईपच्या ठिकणी नविन पाईप बसविण्यास वेळ लागणार आहे. त्यामुळे २८ ऑगस्ट रोजी रोटेशन नुसार पाणी वाटप असलेल्या बुरुडगांव रोड परिसर, सारसनगर परिसर, टिळक रोड माळीवाडा हरिजन वस्ती या भागाचा पाणी पुरवठा बंद राहाणार असून तो २९ ऑगस्ट रोजी करण्यात येईल.

तसेच २९ ऑगस्ट रोजी रोजी पाणी वाटप असलेल्या स्टेशन रोड परिसर, कोठी, आगरकर मळा, संजय नगर, कायनेटिक चौक परिसर, या भागास ३० ऑगस्ट रोजी पाणी पुरवठा करण्यात येईल. तरी नागरिकांनी याची नोंद घेऊन असलेल्या पाण्याचा वापर काटकसरीने करावा व महानगर पालिकेस सहकार्य करावे असे आवाहन पाणीपुरवठा बिभागाने केले आहे.

# सीईटी आणि नीट परीक्षा केंद्रांबाबत मनसे आक्रमक

**जिल्हा प्रशासनाला दिला विद्यार्थी पालकांसमवेत तीव्र आंदोलनाचा इशारा**



सीईटी आणि नीट परीक्षा केंद्रांवर विद्यार्थ्यांना सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात या मागणीचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना देताना मनसेचे शिष्टमंडळ.

नगर - सीईटी आणि नीट परीक्षा केंद्रांवर विद्यार्थ्यांना सर्व सोयी सुविधा प्रशासनाने उपलब्ध करून द्याव्यात, सदर परीक्षा ह्या त्या त्या शहरात अथवा गावात चांगल्या सोयी सुविधा असणाऱ्या परीक्षा केंद्रांवर घेण्यात याव्यात अन्यथा विद्यार्थी आणि पालकांना सोबत घेऊन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला जिल्हाभर आंदोलन करावे लागेल. असा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने जिल्हा प्रशासनाला देण्यात आला आहे.

याबाबत मनसेचे जिल्हाध्यक्ष सचिन डफळ, शहराध्यक्ष गजेंद्र राशिनकर, विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष प्रकाश गायकवाड, शहर उपाध्यक्ष तुषार हिरवे, शहर उपाध्यक्ष संकेत व्यवहारे, शहराध्यक्ष सहकार सेना गणेश शिंदे यांच्या शिष्टमंडळाने निवासी उपजिल्हाधिकारी यांची भेट घेवून निवेदन दिले. यामध्ये म्हंटले आहे की, महाराष्ट्र राज्यात घेतल्या जाणाऱ्या सीईटी आणि नीट परीक्षा अत्यंत महत्त्वाची समजली जाते. सदर परीक्षेसाठी विद्यार्थी खूप अभ्यास करतात. सीईटी आणि नीट परीक्षेवर मुलांचे पुढील इंजीनियरिंग आणि मेडिकल कॉलेजची प्रवेश प्रक्रिया अवलंबून आहे.

राज्यातील प्रत्येक विद्यार्थ्यांचा मिनिट आणि मिनिट अभ्यासासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. प्रत्येक विद्यार्थी त्यासाठी कठोर मेहनत घेतात. परंतु या सिइटी आणि नीट परीक्षेचे परीक्षा केंद्र ही त्यांच्या शहरात व गावापासून सरासरी ६० ते ८० किलोमीटर असलेल्या दुसऱ्या ठिकाणी असतात. परीक्षेच्या दोन तास आधी सदर परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावे लागते. परीक्षा केंद्रावर पोहचण्यासाठी एका गावावरून दुसऱ्या गावाला जाण्यासाठी एसटी बसेस तसेच खाजगी वाहने यांची जुळवाजुळव करताना विद्यार्थी व पालकांची ससेहोलपट होते. त्यात परीक्षा केंद्रावर ती (पुढील मजकूर पान २ वर)

# 'जुनी पेन्शन'साठी मुंबईत सहकुटूंब आंदोलनाचा इशारा

**समन्वय समितीच्या पुण्यातील बैठकीत निर्णय**

नगर - महाराष्ट्र राज्यातील २००५ पूर्वी नियुक्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन समन्वय समितीची राज्यस्तरीय बैठक २६ ऑगस्ट रोजी पुण्यातील साधना विद्यालयात झाली. शासनाने २५ सप्टेंबर पर्यंत जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत ठोस निर्णय न घेतल्यास २८ सप्टेंबरपासून मुंबईतील आझाद मैदानात सहकुटुंब आंदोलन व आमरण उपोषण करण्याचा इशारा बैठकीत देण्यात आला.

राज्यातील विविध जिल्ह्यांमधून आलेल्या प्रतिनिधींनी बैठकीत सहभाग घेतला. यापूर्वी जुनी पेन्शन योजनेसाठी अनेक आंदोलने करण्यात आली असूनही शासनाकडून अपेक्षित निर्णय झालेला नाही. त्यामुळे आता आंदोलनाची अंतिम दिशा निश्चित करण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीत प्रत्येक जिल्ह्याच्या प्रतिनिधींनी आंदोलनाबाबत आपली भूमिका मांडली. शासनाला अंतिम संधी देत १ ते ४ सप्टेंबर या कालावधीत काळ्या फिती लावून शालेय कामकाज करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानंतर ५ सप्टेंबर रोजी (पुढील मजकूर व छायाचित्र पान २ वर)

पाहिजेत
सोनचाफा ज्वेलरी शोरुमकरिता सेल्सगर्ल्स पाहिजे.
आकर्षक पगार
भेटा :
कोहिनूरसमोर, कापडबाजार, अहिल्यानगर
9356352421

पाऊल टाका स्टाईलमध्ये!
एकाच छताखाली हजारो स्टाईल्सची निवड!
पुरुष । महिला । मुलांसाठी
प्रत्येक प्रसंगासाठी योग्य,आरामदायी आणि ट्रेंडी फुटवेअर

पुरुषांसाठी | महिलांसाठी | मुलांसाठी
उपलब्ध नामांकित ब्रॅण्ड्स
adidas NIKE PUMA Reebok SKECHERS asics campus sparx ABROS Bata RELAXO Paragon crocs Hush Puppies RED TAPE WOODLAND WILDCRAFT CONVERSE KOLHAPURI मोजडी
१००% ओरिजनल ब्रॅण्डस | उत्तम क्वॉलिटी | वाजवी दर | संपूर्ण कुटूंबासाठी
आपल्या संपूर्ण कुटूंबासाठी फुटवेअरची परिपूर्ण शॉपिंग!
एम.जी.रोड, कापड बाजार, अहिल्यानगर
आजच भेट द्या !
एकदा या.. पुन्हा याल!
फॅशन आणि मजबुतीचा पत्ता!
Liberty SHOES
लिबर्टी शूज
एम. जी. रोड, कापड बाजार, अहिल्यानगर.
SHOE PALACE
शू पॅलेस
सारडागल्ली, अ.नगर, मो : 9881531536

दशक्रिया विधी

भावपुर्ण श्रद्धांजली
"पवित्र तुमची स्मृती
अनंत तुमची माया"
नित्य असुदया आम्हांवरती
अखंड तुमची छाया..!
स्व.सुरेश (दादा) श्रीधरराव गोफणे
|| दशक्रिया विधी ||
शनिवार दि.२९/०८/२०२६ रोजी
सकाळी ८ वा. ठिकाण : अमरधाम, नालेगाव,अहिल्यानगर
: शोकाकूल :
गं.भा.विमल सुरेश गोफणे (पत्नी) — गं.भा. वैशाली श्रीकांत गोफणे (भावजयी)
सौ. नूतन राहुल मिसाळ (मुलगी) — श्री.राहुल आप्पासासाहेब मिसाळ (जावई)
श्री. सुधीर सुरेश गोफणे (मुलगा) — सौ. जयश्री सुधीर गोफणे (सून)
श्री. अमोल सुरेश गोफणे (मुलगा) — सौ. स्नेहा अमोल गोफणे (सून)
श्री. अविनाश श्रीकांत गोफणे (पुतण्या) — सौ. स्वप्नाली अविनाश गोफणे (सून)
श्री.अतूल श्रीकांत गोफणे (पुतण्या)
समस्त गोफणे परिवार व आप्तेष्ट

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## भिंगारमध्ये तलवार बाळगणाऱ्या तरुणाला पोलिसांनी पकडले

नगर - भिंगार शहरात बेकायदेशीरपणे धारदार लोखंडी तलवार बाळगणाऱ्या एका तरुणावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई २७ ऑगस्ट रोजी रात्री सदर बाजार परिसरातील मटन मार्केटजवळील मोकळ्या पटांगणात करण्यात आली.

कॅम्प पोलीस ठाण्याचे पो.कॉ.प्रमोद लहारे हे सहकाऱ्यांसह गस्त घालत होते. त्यावेळी रात्री आठ वाजेच्या सुमारास मटन मार्केटच्या मोकळ्या मैदानात एक संशयित तरुण थांबलेला दिसला. पोलिसांनी तातडीने धाव घेऊन त्याची झडती घेतली असता, त्याच्याकडे एक लोखंडी तलवार आढळून आली.

या प्रकरणी पोलिसांनी सचिन नितीन जाधव (वय २३, रा. पाटील गल्ली, भिंगार) या तरुणाला ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडून सुमारे १ हजार ५०० रुपये किमतीची, ५४ सेंटीमीटर लांब व पितळी मूठ असलेली धारदार तलवार जप्त करण्यात आली आहे. कोणत्याही परवान्याशिवाय घातक शस्त्र बाळगल्यामुळे त्याच्यावर पो.कॉ.प्रमोद लहारे यांच्या फिर्यादीवरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार कायद्यानुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

पोलीस हवालदार व्ही. आर. गारुडकर या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. सार्वजनिक ठिकाणी अशा प्रकारे बेकायदेशीर शस्त्रे बाळगणाऱ्यांवर पोलिसांची करडी नजर असल्याचे सांगण्यात आले.

## अहिल्यानगर शहरातील अवैध मावा बनवणारे दोन कारखाने उद्ध्वस्त करत ४ लाख ३९ हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी केला जप्त

नगर - नगर जिल्ह्यात अवैध व्यवसाय करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी दिले होते. या आदेशाची अंमलबजावणी करत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी दोन पथके तयार करून शहरात अवैध गुटखा, मावा व सुगंधी तंबाखू विक्रेत्यांचा शोध घेण्यासाठी पथके रवाना केली होती. या पथकांनी २७ ऑगस्ट रोजी दोन वेगवेगळ्या ठिकाणांवर छापे टाकून कारवाई केली. या कारवाईदरम्यान तोफखाना पोलीस ठाण्यात पाच जणांविरुद्ध दोन गुन्हे दाखल करण्यात आले असून, एकूण ४ लाख ३९ हजार ४८६ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पहिल्या कारवाईत तोफखाना पोलीस स्टेशन हद्दीत ६६ हजार ९८६ रुपये किमतीची इलेक्ट्रिक मशीन, वजन काटा, ९ किलो सुगंधी तंबाखू आणि ३ किलो मावा असा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून,


अहिल्यानगर शहरातील अवैध मावा बनवणारे दोन कारखाने उद्ध्वस्त करत जप्त केलेल्या मुद्देमालासह स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

याप्रकरणी आदेश किसन भिंगारदिवे (वय २३, रा. भिंगारदिवे मळा, गांधीनगर, बोल्हेगाव, अहिल्यानगर) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

दुसऱ्या कारवाईत ३ लाख ७२ हजार ५०० रुपये किमतीचा मावा बनवण्याची इलेक्ट्रिक मशीन, सुपारी बारीक करण्याची मशीन, ४० किलो मावा, १७ किलो सुगंधी तंबाखू, १२० किलो सुपारी आणि २५ किलो सुपारीचा चुरा असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी कृष्णा यादव वैराळ (रा. सर्जेपुरा, अहिल्यानगर), मोसीम रफिक शेख, वसीम रफिक शेख (दोघे रा. मुकूंदनगर, अहिल्यानगर) आणि राकेश सब्बन (फरार, रा. दातरंगे मळा, अहिल्यानगर) यांच्याविरुद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार अरूण गांगुर्डे, विकास साळवे, गणेश धोत्रे, योगेश भिंगारदिवे, संदीप पवार, विजय ठोंबरे, अतुल लोटके, शाहीद शेख, अभिजीत आरकल, सतीष भवर व महिला पोलीस अंमलदार चिमा काळे व सुनिता पवार यांच्या पथकांनी केली आहे.

## सुगंधी तंबाखू, गुटख्याच्या अड्ड्यांवर ५ ठिकाणी छापे, ८ जणांवर गुन्हे दाखल

नगर - जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशाने स्थानिक गुन्हे शाखेने धडक मोहीम उघडली आहे. पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने सोनई व बेलवंडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत तब्बल ५ ठिकाणी अचानक छापे टाकून ८९ हजार ३६६ रुपयांचा सुगंधी तंबाखू,मावा व गुटखा जप्त केला.


सोनई व बेलवंडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत ५ ठिकाणी छापे टाकून जप्त केलेल्या सुगंधी तंबाखू,मावा व गुटखा या मुद्देमालासमवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

या कारवाईत शब्बीर महेताब सय्यद (वय ४५, रा.सोनई, ता. नेवासा),जावेद उस्मान शेख (वय ५२, रा.हलवाई गल्ली, सोनई),सोमनाथ उर्फ गणेश प्रकाश घोरपडे (वय ३५,रा. चिंभळा,ता. श्रीगोंदा),संकेत अशोक पाचपुते (रा. काष्टी - फरार),विजय सतीष चोरडिया (वय ३३,रा.चिंभळा,ता. श्रीगोंदा), कमलेश मुरली कृपालीनी (रा.दौंड फरार), जाकीर इसाक शेख (वय ३९, रा.बेलवंडी,ता.श्रीगोंदा), फयाज तांबोळी (रा.अहिल्यानगर - फरार) असे गुन्हा दाखल झालेल्या संशयित इसमांची नावे आहेत.

सदरची कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या सूचनेनुसार पोलीस अंमलदार निळकंठ कारखेले, अतुल लोटके, विकास साळवे, सतीष भवर, गणेश लोंढे, रोहित येमुल, बाळासाहेब गुंजाळ, रणजीत जाधव, शामसुंदर जाधव, प्रताप देवकाते, मनोज साखरे, अमोल आजबे, प्रकाश मांडगे व अमोल कोतकर यांनी केली आहे.


जुन्या पेन्शनसाठी निर्णायक आंदोलन करण्याबाबत पुणे येथील बैठकीसाठी जमलेले राज्यभरातील विविध शिक्षक संघटनांचे प्रतिनिधी.

## 'जुनी पेन्शन'साठी मुंबईत सहकुटूंब आंदोलनाचा इशारा

(पान १ वरुन)

महाराष्ट्रातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांवर मूक मोर्चा काढून शासनाला निवेदन देण्यात येणार आहे. जुनी पेन्शन लागू करा, अन्यथा इच्छा मरणाची परवानगी द्या, अशी टोकाची भूमिका घेण्याची वेळ शासनाने कर्मचाऱ्यांवर आणू नये, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. शासनाने राज्यातील २००५ पूर्वी नियुक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन समन्वय समितीच्या वतीने करण्यात आली आहे.


## सीईटी आणि नीट परीक्षा केंद्रांबाबत मनसे आक्रमक

***(पान १ वरुन)*** वेळेत पोहोचले नाही तर ते विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहतात त्यामुळे त्यांचे वर्ष वाया जाऊन शैक्षणिक नुकसान होते. परीक्षा देता न आल्या कारणाने काही विद्यार्थी नैराश्यात जाऊन आत्महत्या करण्याचे प्रकार देखील घडू शकतात. सदर विद्यार्थी वेळेत पोहोचले तरी त्या कॉलेजवर परीक्षेसाठी असणारी विद्यार्थ्यांची सुविधा ही अत्यंत केविलवाणी असते. विद्यार्थ्यांना बसण्यास खुर्ची व्यवस्थित नसते, परीक्षेसाठी असणारे संगणक हँग होतात, परीक्षा केंद्रावरील लाईट जातात, जनरेटरची अपुरी सुविधा, सदर परीक्षा उन्हाळ्यात असल्याने वर्गात बऱ्याच ठिकाणी फॅन आणि पिण्याच्या पाण्याची देखील सुविधा नसते. अशा अनेक आणि अनेक त्रुटी परीक्षा केंद्र वर आढळून येतात. अशा अनेक अडचणींवर मात करत विद्यार्थ्यांना सदर परीक्षा केंद्रावर परीक्षा द्याव्या लागतात आणि त्यामुळे एकाग्रतेने आणि शांतचित्ताने त्यांना परीक्षा देण्यास अडचण येते त्याचा परिणाम त्यांच्या परीक्षेच्या निकालावर होतो. एवढी महत्त्वाची परीक्षा असून देखील राज्य सरकार या गोष्टीकडे सोयीस्कर दुर्लक्ष करत असून ही गोष्ट अत्यंत खेददायक आहे. सीईटी आणि नीट परीक्षा ही त्या त्या शहरात अथवा गावात का होत नाही? सदर परीक्षा केंद्र यांचे शिक्षण खात्याकडून परीक्षेपूर्वी तपासणी मोहीम का राबवली जात नाही? ज्या ज्या परीक्षा केंद्रावर वारंवार त्रुटी आढळून देखील ती परीक्षा केंद्र रद्द का करीत नाहीत? असे अनेक प्रश्न आम्हास विद्यार्थी आणि पालकांनी कळवले आहेत. त्यामुळे सदर गोष्टीकडे गांभीर्यपूर्वक पहावे आणि सदर परीक्षा ह्या त्या त्या शहरात अथवा गावात चांगल्या सोयी सुविधा असणाऱ्या परीक्षा केंद्रांवर घेण्यात याव्यात अन्यथा विद्यार्थी आणि पालकांना सोबत घेऊन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला जिल्हाभर आंदोलन करावे लागेल. असा इशारा या निवेदनात देण्यात आला आहे.

## रस्ता अपघातात जखमी झालेल्याचा मृत्यू

नगर - अरणगाव बायपास परिसरात झालेल्या रस्ता अपघातात गंभीर जखमी झालेल्या व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. राम भाऊसाहेब शिंदे (वय ४६, रा. अरणगाव, मेहराबाद, ता. नगर) असे मृताचे नाव आहे. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राम शिंदे यांचा १५ ऑगस्ट रोजी रात्री ९.४० वाजण्याच्या सुमारास दळवी मळा, अरणगाव बायपास परिसरात रस्ता अपघात झाला होता. अपघातात जखमी झाल्यानंतर त्यांचा मुलगा रूपेश शिंदे यांनी त्यांना उपचारासाठी नगरमधील खासगी रूग्णालयात दाखल केले होते. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर रूग्णालयात उपचार सुरू होते. मात्र, उपचारादरम्यान २२ ऑगस्ट रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास त्यांचा मृत्यू झाला.

## संजय शिर्के यांचे अल्प आजाराने निधन



नगर - बाराबाभळी येथील रहिवासी संजय छगन शिर्के (वय ५५) यांचे २८ ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बाराबाभळी अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, वडील, पत्नी, २ मुले असा परिवार आहे.

## चंपालाल पवार यांचे दु:खद निधन

नगर - झारेकरगल्ली, जुन्या कोर्टामागील रहिवासी चंपालाल गोटुराम पवार (लखारा) (वय ६८) यांचे २८ ऑगस्ट रोजी पहाटे दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे १ भाऊ, पत्नी, ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते उदय प्रिंटर्सचे संचालक होते. हिरालाल पवार यांचे ते लहान बंधू तर किरण, सुमित, रोहित लखारा यांचे ते वडील होत.

## अनंत पलंगे यांचे अल्प आजाराने निधन

नगर - सबजेल चौक येथील रहिवासी अनंत छबुराव पलंगे (वय ४२) यांचे २७ ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २७ ऑगस्ट रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे आई, पत्नी, २ मुले, बहिणी असा परिवार आहे. सबजेल चौकातील तुळजा भवानी मंदिराचे ते मानकरी होते.

## नवनाथ मोरे यांचे अल्प आजाराने निधन

भिंगार - धनगरगल्ली, भिंगार टेकडी येथील रहिवासी नवनाथ सुदाम मोरे (अण्णा) (वय ५२) यांचे २७ ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे आई, पत्नी, १ मुलगी, २ भाऊ, भावजया, पुतणे असा परिवार आहे. एकनाथ व पप्पू मोरे यांचे ते मोठे बंधू होत.

## मोपेडची चोरी

नगर - सावेडी उपनगरातील झोपडी कँटीन परिसरातून टीव्हीएस कंपनीची पेप स्कुटी (क्र.एमएच १६ डीए ४७२८) अज्ञात चोरट्याने दिवसाढवळ्या चोरून नेल्याची घटना घडली आहे. याबाबत श्याम रामकृष्ण शर्मा (वय ८२, रा. सिंधी मंगल कार्यालयासमोर, आराधना स्टेट बँक कॉलनी, भुतकरवाडी, अहिल्यानगर) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. श्याम शर्मा हे १७ ऑगस्टला दुपारी सव्वातीन वाजेच्या सुमारास शिंदे डिपार्टमेंट स्टोअर येथे गेले होते. त्यांनी आपली स्कुटी रुचीरा स्विट होम, झोपडी कँटीनसमोर पार्किंगमध्ये लावली होती. त्यानंतर आपले काम आटपून ते परत आले असता, त्यांना त्यांची स्कुटी पार्किंग केलेल्या ठिकाणी आढळून आली नाही. आजूबाजूला व परिसरात शोधाशोध केल्यानंतरही गाडी मिळाली नाही. अखेर अज्ञात चोरट्याने स्कुटी चोरून नेल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी तोफखाना पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## मावा तयार करणाऱ्या कारखान्यावर पोलिसांची मोठी कारवाई

### १८ लाख ३३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त, तिघांवर गुन्हा दाखल

नगर - शेवगाव शहरात बेकायदेशीरपणे सुगंधी तंबाखू आणि सुपारीचा मावा तयार करणाऱ्या अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखेने छापा टाकून मोठी कारवाई केली आहे. या धडक कारवाईत पोलिसांनी इलेक्ट्रिक मशीन, मावा, सुगंधी तंबाखू आणि दोन कारसह एकूण १८ लाख ३३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.


शेवगाव येथे मावा तयार करणाऱ्या कारखान्यावर कारवाई करून जप्त केलेल्या मुद्देमालासह स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यातील अवैध व्यवसायांवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले होते. या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी यांनी पोलीस अंमलदार गणेश लोंढे, निळकंठ कारखेले, रणजीत जाधव, रोहित येमुल, सतीष भवर व बाळासाहेब गुंजाळ यांचे एक पथक तयार करून शेवगाव परिसरात पेट्रोलिंगसाठी पाठवले होते. यादरम्यान, शेवगावमधील कोरडे वस्ती येथील एका पत्र्याच्या शेडमध्ये मशीनच्या साहाय्याने सुगंधी तंबाखू व सुपारीचा मावा तयार करून त्याची विक्री केली जात असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली.

मिळालेल्या माहितीच्या आधारे पथकाने पंचासमक्ष सदर ठिकाणी छापा टाकला. त्यावेळी दोन इसम इलेक्ट्रिक मशीनवर मावा तयार करताना आढळले. पोलिसांनी वसीम सत्तार तांबोळी (रा. श्रीरामपूर, हल्ली रा. शेवगाव) आणि शाहरूख उर्फ जावेद सलीम शेख (रा. शेवगाव) या दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे अधिक चौकशी केली असता, मुख्य आरोपी आसिफ रहेमान तांबोळी (रा. भगतसिंग चौक, शेवगाव) याच्या सांगण्यावरून हा अवैध मावा तयार केला जात असून, तो कारमधून नेऊन विकला जात असल्याची माहिती समोर आली.

या कारवाईदरम्यान पोलिसांनी २ लाख रुपयांची मावा तयार करण्याची दोन इलेक्ट्रिक मशीन, ६५ हजार रुपयांची सुगंधी तंबाखू, १ लाख ६० हजार रुपयांचा तयार मावा, ४ लाख रुपयांचा सुपारी चुरा, १५ हजार रुपयांची सुगंधी तंबाखू, १ हजार रुपयांचा कलर, १२ हजार रुपयांचे दोन वजन काटे, तसेच २ लाख ३० हजार रुपयांची सॅन्ट्रो कार आणि ७ लाख ५० हजार रुपयांची टाटा झेस्ट कार असा एकूण १८ लाख ३३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी शेवगाव पोलीस ठाण्यात तिघांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, फरार मुख्य आरोपीचा शोध घेतला जात आहे.

## जिल्ह्यातील पहिली महिला सिव्हिल इंजिनिअर - कै. वासंती पांढरे



नगरमध्ये असे काही स्त्री रत्न आहेत की ज्यांची माहिती बऱ्याच लोकांना विशेषत: तरुण पिढीला माहित नाही. यातील एक महिला म्हणजे सौ. वासंती दिलीप पांढरे या होय. प्रसिध्द समाजसेवक माजी नगराध्यक्ष व खलिफा या नावाने प्रसिध्द असलेले दत्तू खलिफा व नानीबाई जाधव पहिल्या नगरसेविका यांची कन्या, दिलीप पांढरे यांच्या सौभाग्यवती होय. घरी कुठलेही शैक्षणिक वातावरण नसतांना त्यांनी जिद्दीने शैक्षणिक क्षेत्रामध्ये आपली प्रगती केली. त्यांनी आपले शालेय शिक्षण नगरपालिकेच्या शाळेतुन पुर्ण केले. त्यानंतर पुण्यातील गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ इंजिनिअरींग कॉलेजमध्ये १९७४ मध्ये डिप्लोमा इन सिव्हिल इंजिनिअरींग ही पदवी उच्च श्रेणीत प्राप्त केली. त्यानंतर नगरमध्ये त्या स्थायीक झाल्या. दिलीप पांढरे यांच्याशी विवाह करुन नगरमध्ये दोघांनी मिळून बांधकाम व्यवसायात प्रवेश केला. स्थायीक झाल्यानंतर स्त्री असून या क्षेत्रात त्यांनी बांधकाम क्षेत्रात उत्तम कामगिरी करून नावलौकिक मिळविले.

नगरमधील प्रसिध्द महावीर कलादालन, जिल्हा परिषदेच्या इमारती, अर्बन बँकेची नवीन इमारत इ. कामे यशस्वीपणे पुर्ण केल्यामुळे सर्व सत्कार मंत्र्यांचे हस्ते झाले. नगरमधील पहिली फ्लॅट सिस्टीम प्रबोधन हाऊसिंग सोसायटी त्यांच्या कारकिर्दीत सुरु केली. हे काम यशस्वीपणे पुर्ण करण्याबद्दल त्यांना एक फ्लॅट बक्षीसरुपी देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर अनेक रेसिडेन्शीअल व कमर्शिअल कॉम्पलेक्स, नगरपालिकेची कामे त्यांनी यशस्वीरित्या पुर्ण केली. समाजसेवेची आवड असल्यामुळे गोरगरिबांसाठी उत्तम प्रतिची व कमी किंमतीत घरे बांधुन सामाजिक बांधिलकी जपली. याव्यतिरिक्त सामाजिक क्षेत्रातही त्यांचे भरीव कार्य दिसून येते. महात्मा फुले शैक्षणिक संस्थेच्या त्या व्हाईस चेअरमन असतांना माळी समाजासाठी मोलाचे योगदान दिले. महिला मंडळ शाळेच्या डायरेक्टर, आई वडिलांपासून लाभलेला समाजसेवेचा वारसा सांभाळतात. तोफखान्यातील अनेक लोकांचे प्रश्न सोडविले. सगळ्या जबाबदाऱ्या सांभाळुन त्यांनी घराचीही जबाबदारी उत्तम रितीने पार पाडली. त्यांच्या मोठ्या मुलाला त्यांनी बी. ई. सिव्हील करुन आपल्या व्यवसायात समावेश केला. मुलांना, मुलीला उच्च शिक्षण दिले. त्यांच्या सुनाही उच्च शिक्षीत आहेत. अशा या जिल्ह्यातील पहिल्या महिला सिव्हील इंजिनियर वासंतीबाई पांढरे यांचे २१ ऑगस्ट रोजी वयाच्या ८० व्या वर्षी निधन झाले. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

## बांधकामाची तक्रार केल्याच्या रागातून घरात घुसून मारहाण

### केडगावच्या भूषणनगर येथील घटना, चौघा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर - केडगाव उपनगरातील भूषणनगर भागात अनधिकृत बांधकामाची महापालिकेत तक्रार केल्याच्या कारणावरून एका महिलेसह तिच्या कुटुंबीयांवर लाकडी दांडक्याने जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध मारहाण व जीवे मारण्याची धमकी दिल्याचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

याबाबत उषा विजय मुनोत (वय ६१, रा. दत्त चौक, भूषणनगर, केडगाव) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांच्या घरासमोर आरोपींचे बांधकाम सुरू होते. सदर बांधकाम बंद का पाडले आणि त्याची महापालिकेकडे तक्रार का केली, असा जाब विचारत आरोपींनी वाद घातला. या वादातून आरोपी शुभम बाबा आहिरे आणि किशोर मडके यांच्या मुलाने हातातील लाकडी दांडक्याने उषा मुनोत यांच्या पायावर जबर मारहाण केली.

तसेच शुभम आहिरे याची आई व किशोर मडके यांच्या पत्नीने मुनोत यांच्या नातेवाईकांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करत घराच्या दिशेने दगड आणि विटांची फेकाफेक केली. यानंतर आरोपींनी, आमच्या नादी लागलात तर तुमच्यावर खोटा गुन्हा दाखल करू आणि एकेकाला जीवे मारून टाकू, अशी धमकी दिली.

जखमी अवस्थेत उषा मुनोत यांनी दिलेल्या तक्रारीवरून कोतवाली पोलिसांनी शुभम बाबा आहिरे, त्याची आई, किशोर मडके यांची पत्नी व मुलगा अशा चौघांविरुद्ध विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे. पोलीस हवालदार राहुल शिंदे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टतर्फे ३१ ऑगस्टला महाप्रसाद

नगर - पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही श्रावण महिन्यानिमित्त तिसऱ्या श्रावणी सोमवारच्या पावन पर्वावर भव्य महाप्रसाद भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. ३१ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ वाजता श्री मार्कंडेय शैक्षणिक संकुल, नेप्ती नाका जवळ, अहिल्यानगर येथे हा महाप्रसाद होणार आहे. श्रावण सोमवारनिमित्त आयोजित या महाप्रसादात यावर्षी पद्मशाली समाजामध्ये प्रसिद्ध असलेला 'पप्पू बुवा शिरा' म्हणजेच वरण, भात आणि शिरा असा पारंपरिक महाप्रसाद ठेवण्यात आला आहे. या विशेष महाप्रसादाचा लाभ परिसरातील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे. महाप्रसादासाठी शिधा, अन्नधान्य अथवा देणगीच्या स्वरूपात सहकार्य करू इच्छिणाऱ्या भाविकांनी पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. मोबाईल क्रमांक : ९५१८९१३०८० यावर संपर्क साधता येणार आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### भरड धान्य खाण्याचे फायदे

भरड धान्याला खूप महत्व आले आहे. ज्वारी, बाजरी, नाचणी, वरी, राळा, कोदो, कुटकी ही सर्व भरड धान्ये आहेत. एकेकाळी गरीबांचे अन्न म्हणून याकडे पाहिले जायचे, पण आता हेच धान्य श्रीमंतांचे सुपरफूड बनले आहे. याचे कारण म्हणजे यातील असलेले अफाट पौष्टिक गुण.गहू आणि तांदळाच्या तुलनेत मिलेट्समध्ये फायबरचे प्रमाण खूप जास्त असते. त्यामुळे पोट जास्त काळ भरलेले राहते, बद्धकोष्ठतेचा त्रास कमी होतो आणि वजन नियंत्रणात राहण्यास मदत होते. दुसरे महत्वाचे म्हणजे मिलेट्सचा ग्लायसेमिक इंडेक्स खूप कमी असतो. म्हणजेच ते खाल्लयावर रक्तातील साखर एकदम वाढत नाही. त्यामुळे मधुमेह असणाऱ्या लोकांसाठी हे एक वरदानच आहे. नाचणीमध्ये तर दुधापेक्षाही जास्त कॅल्शियम असते, ज्यामुळे हाडे मजबूत होतात आणि विशेषतः महिला आणि लहान मुलांसाठी ते खूप फायदेशीर आहे.बाजरी आणि ज्वारीमध्ये लोहाचे प्रमाण भरपूर असते, ज्यामुळे शरीरातील हिमोग्लोबिन वाढण्यास मदत होते आणि थकवा दूर होतो. तसेच ही धान्ये ग्लूटेन फ्री असतात. ज्यांना गव्हाची अलर्जी आहे किंवा ज्यांचे पोट गहू खाल्लयावर फुगते, त्यांच्यासाठी मिलेट्स हा सर्वोत्तम पर्याय आहे. यात असलेले मॅग्नेशियम आणि पोटॅशियम हृदयाच्या आरोग्यासाठी चांगले असते आणि रक्तदाब नियंत्रणात ठेवते. नियमितपणे भरड धान्य खाल्लयाने शरीरातील वाईट कोलेस्ट्रॉल कमी होते. थोडक्यात सांगायचे तर, आपल्या शरीराला लागणारे सर्व महत्वाचे जीवनसत्वे, खनिजे आणि प्रथिने एकाच ठिकाणी हवी असतील तर आपल्या रोजच्या आहारात पोळी-भाकरीच्या स्वरूपात किंवा खिचडी, डोसा, लाडू या स्वरूपात मिलेट्सचा समावेश करणे ही काळाची गरज आहे.

## पाककला

### लोणचं-ठेचा पराठा

**साहित्य :** गव्हाचे पीठ १ वाटी, आंब्याचे लोणचे २ चमचे तेलासकट, हिरव्या मिरचीचा ठेचा २ चमचे, बारीक चिरलेला कांदा १ लहान, बारीक चिरलेली कोथिंबीर १ चमचा, ओवा १/४ चमचा, तेल किंवा तूप पराठा भाजण्यासाठी आवश्यकतेनुसार

**कृती :** एका मोठ्या भांड्यात गव्हाचे पीठ घ्या. त्यात आंब्याचे लोणचे, हिरव्या मिरचीचा ठेचा, चिरलेला कांदा, कोथिंबीर आणि ओवा घालून मिश्रण एकजीव करा. यात वेगळे मीठ किंवा तिखट घालण्याची गरज नाही कारण लोणचे आणि ठेच्यात ते आधीच असते. थोडे थोडे पाणी घालून घट्ट गोळा मळून घ्या आणि ५ मिनिटे झाकून ठेवा. मळलेल्या पिठाचा छोटा गोळा घेऊन जाडसर पराठा लाटून घ्या. तवा गरम करून त्यावर थोडे तेल किंवा तूप सोडा. पराठा ठेवा आणि मध्यम आचेवर दोन्ही बाजूने खरपूस आणि सोनेरी रंग येईपर्यंत भाजून घ्या. तयार गरमागरम लोणचं-ठेचा पराठा दही किंवा लोण्याबरोबर गरम सर्व्ह करा.

## वास्तू

### जागा कमी असेल तर...

* हॉलमध्ये उत्तर किंवा पूर्व भिंतीवर मोठा आरसा लावल्याने घर मोठे दिसते आणि सकारात्मक ऊर्जा वाढते.

* किचन आणि बेड एकत्र असेल तर पडदा किंवा छोटी लाकडी पार्टीशन लावा. किचनचा ओटा नेहमी आग्नेय कोपऱ्यात ठेवा.

* दरवाजासमोर आरसा किंवा कचरा कधीच ठेवू नका. दरवाजाजवळ तुळस किंवा मनीप्लांट लावा.

## सौंदर्य

एक चमचा साखर + एक चमचा मध मिक्स करा. या मिश्रणाने ओठांना २ मिनिटे हलक्या हाताने मसाज करा. आठवड्यातून २ वेळा केल्याने मृत त्वचा निघून जाते आणि ओठ गुलाबी होतात.

## सल्ला

फोडणी करताना कढई झाकून ठेवा, तेल कमी लागते. ०तळणाचे तेल २ वेळापेक्षा जास्त वापरू नका.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शनिवार, दि. २९ ऑगस्ट २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, श्रावण कृष्णपक्ष, पू.भा.२७।४२, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०६ वा. २९ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आज कामात उत्साह राहील. नवीन संधी मिळेल.

**वृषभ :** कुटुंबात आनंदाचे वातावरण राहील. प्रवासाचा योग आहे.

**मिथुन :** आज बोलण्यावर नियंत्रण ठेवा. वाद होऊ शकतो.

**कर्क :** प्रेम संबंधात गोडवा येईल. विद्यार्थ्यांसाठी दिवस चांगला आहे.

**सिंह :** आत्मविश्वास वाढेल. अडकलेले काम पूर्ण होईल.

**कन्या :** खर्च वाढेल. गुंतवणूक करताना विचार करा. मित्रांची मदत मिळेल.

**तूळ :** फायदा होईल. जोडीदारासोबत वेळ जाईल.

**वृश्चिक :** रागावर नियंत्रण ठेवा. आरोग्य बिघडू शकते.

**धनु :** नशिबाची साथ मिळेल. धार्मिक कार्यात मन लागेल.

**मकर :** कामाचा ताण जाणवेल. तरीही संध्याकाळपर्यंत यश मिळेल.

**कुंभ :** नवीन ओळखी फायदेशीर ठरतील. प्रेमात यश मिळेल.

**मीन :** आजचा दिवस मौज-मजेत जाईल. मुलांकडून आनंद मिळेल.

## शब्दगंध क्र. ७५०४ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ४ | ■ | ५ | ६ |
| | ■ | ७ | | | ■ | ८ | |
| ९ | १० | | ■ | ११ | १२ | | |
| १३ | | ■ | १४ | | | ■ | |
| १५ | | १६ | ■ | १७ | | १८ | ■ |
| ■ | १९ | | | ■ | २० | | ■ |
| २१ | ■ | | ■ | ■ | २२ | | २३ |
| २४ | | | | | ■ | २५ | |

**आडवे शब्द :-** १) कोलकात्याजवळील एक जंगल ५) जनावर जिला बांधतात ती जमिनीत मारलेले खुंटी ७) ताटली; गुजराणाकरिता दिलेली इनामी जमीन ८) एक प्राणी; लंबकर्ण; गाढव; रासभ; गर्दभ ९) नुसते बोलणारा; वाचीवीर ११) चाहडी; चुगली; भांडण लावणे १३) दोष; लहान खिळा; मिस्टेक १४) शरीरप्रकृतीत निर्माण होणारा दोष; आजार १५) पती; स्वामी; मालक; यजमान १७) सैन्याला पुरविला जाणारा दारूगोळा, दाणागोटा वगैरे १९) एक प्रकारचे हलके रेशमी वस्त्र २०) दबाव; दडपण; वजन २२) दात; सुळे २४) स्पष्ट; भर २५) उपवन; बगीचा; उद्यान

**उभे शब्द :-** एक म्हण - ++ +++ खोकला गेला २) रसाने भरलेले; रसमय ३) दाट झाडी असलेली जागा ४) नकला करणारा ५) कमरपट्टा; कटिसूत्र ६) कोवळे दूध तापवून त्यात साखर वगैरे घालून केलेले खाद्य १०) एक भाजी १२) उत्तराधिकारी; हक्कदार १६) मध्यम प्रतीचा १८) आदरयुक्त भीती २१) चार बाजूंनी पाणी व मध्ये जमीन असा प्रदेश २३) वस्तू; डाग, पर्वत

### शब्दगंध क्र. ७५०३ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| स | ■ | वि | ■ | अ | र | व | ली |
| वि | ना | का | र | ण | ■ | ■ | न |
| ता | म | स | ■ | कु | ब | ड | ■ |
| ■ | दा | ■ | प्रा | ची | ■ | बा | ग |
| च | र | स | ■ | दा | वा | ■ | र |
| क | ■ | र | ■ | र | स | रं | ग |
| म | व | स | र | ■ | ला | ■ | री |
| क | ण | ■ | त | र | त | री | त |

### फिल्मीचक्कर क्र. १२५१ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सा | जा | शि | वा | जी | ■ | ज | मा |
| जा | ■ | का | ■ | व | न | मा | ला |
| औ | ■ | र | ■ | न | ■ | ना | ■ |
| र | ती | ■ | अ | मृ | ता | ■ | ब |
| रं | ■ | दा | ■ | ल्लू | ■ | सा | व |
| क | न्या | दा | न | ■ | ति | त | ली |
| ■ | ■ | ■ | र | ■ | रं | ■ | ■ |
| सा | म | चा | म | गं | गा | रा | म |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** खरं प्रेम हे शब्दांतून नाही, तर समोरच्याच्या काळजीतून दिसतं.

# मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

## विदेशी शिक्का लागलेले हे खेळ मुळचे भारतीय आहेत हे तुम्हाला माहित आहे का?

भारतीय मातीत जन्मलेले खेळ आणि त्यांचे विदेशी अवतारआज आपण लुडो, बुद्धिबळ, सापशिडी, बॅडमिंटन आणि क्रिकेटसारखे खेळ पाहतो तेव्हा सहज वाटते की हे सर्व खेळ इंग्रजांनी आपल्याला दिले आहेत. पण सत्य याच्या अगदी उलट आहे. या बहुतेक खेळांची मुळे हजारो वर्षांपूर्वी भारतीय मातीतच रुजलेली आहेत. प्राचीन काळी भारतात खेळ हे केवळ टाइमपास नव्हते. प्रत्येक खेळामागे एक तत्वज्ञान, एक जीवनशिक्षण आणि एक युद्धनीती दडलेली होती. पुढे व्यापारी, प्रवासी आणि राज्यकर्ते यांच्या माध्यमातून हेच खेळ देशाबाहेर गेले. परदेशी लोकांनी आपल्या सोयीनुसार त्यात थोडेफार बदल केले, नियम सोपे केले आणि त्याला नवीन इंग्रजी नाव देऊन जगासमोर स्वतःचा खेळ म्हणून सादर केले.

याचे सर्वात मोठे आणि सर्वमान्य उदाहरण म्हणजे बुद्धिबळ. गुप्त साम्राज्याच्या काळात भारतात चतुरंग नावाचा खेळ खेळला जात होता. चतुरंग म्हणजे सैन्याचे चार भाग - हत्ती, घोडा, रथ आणि पायदळ. राजाला युद्धनीती शिकवण्यासाठी हा खेळ राजवाड्यात खेळला जायचा. हा खेळ भारतातून पर्शियामध्ये गेला, तिथे त्याचे नाव चतरंज झाले आणि तिथून तो अरब देशात आणि मग युरोपात पोहोचला. युरोपियन लोकांनी त्यातील हत्तीचा वजीर केला, रथाचा हत्ती केला आणि नियमात बदल करून त्याला चेस असे नाव दिले.दुसरा अतिशय लोकप्रिय खेळ म्हणजे लुडो. त्याचे प्राचीन नाव पचीसी किंवा चौपड असे होते. महाभारतात कौरव आणि पांडवांनी याच चौपडावर द्यूत खेळले होते याचा उल्लेख आहे.

मुघल काळात तर बादशहा अकबर आपल्या महालाच्या आवारात जमिनीवर मोठी पचीसीची फळी बनवून जिवंत माणसांना सोंगट्या म्हणून वापरून हा खेळ खेळत असे. इंग्रजांना हा खेळ इतका आवडला की त्यांनी याची मोठी फळी लहान करून, त्याला क्रॉसचा आकार देऊन अधिक सोपे केले आणि १८९६ मध्ये लुडो या नावाने स्वतःच्या नावावर त्याचे पेटंट घेतले.आपल्या लहानपणीचा आवडता सापशिडीचा खेळ तर मूळतः एक आध्यात्मिक खेळ होता. त्याचे नाव होते मोक्षपटम किंवा परमपद सोपानम. तेराव्या शतकात संत ज्ञानदेवांनी लहान मुलांना कर्माचे सिद्धांत समजावे म्हणून या खेळाची निर्मिती केली होती. या खेळात शंभरावे घर म्हणजे मोक्षाचे घर असायचे. मधल्या शिड्या म्हणजे दया, सत्य, नम्रता यांसारखी चांगली कर्मे जी माणसाला मोक्षाकडे नेतात आणि साप म्हणजे चोरी, खोटे बोलणे, राग यांसारखी वाईट कर्मे जी माणसाला खाली पाडतात. हे तत्वज्ञान मुलांच्या मनावर बिंबवणे हा त्यामागचा उद्देश होता.

पण इंग्रजांनी जेव्हा हा खेळ इंग्लंडमध्ये नेला तेव्हा त्यातील संपूर्ण अध्यात्माचा भाग काढून टाकला आणि केवळ साप आणि शिडी ठेवून त्याला एक लहान मुलांचा बोर्ड गेम बनवले.पुण्यात जन्मलेला बॅडमिंटन आणि मणिपूरमध्ये जन्मलेला पोलो यांची गोष्टही तशीच आहे. पुण्यात ब्रिटिश अधिकारी कोंबड्याच्या पिसांपासून बनवलेला चेंडू आणि लाकडी रॅकेटने एक खेळ खेळायचे. त्यामुळे त्याला पूना गेमच म्हटले जायचे. पुढे ते तो खेळ इंग्लंडमधील बॅडमिंटन हाऊस नावाच्या वाड्यात खेळू लागले म्हणून त्याचे नाव बॅडमिंटन पडले. तर मणिपूरचा पारंपारिक खेळ सागोल कांगजेई हा सातव्या शतकापासून घोड्यावर बसून खेळला जात होता.

इंग्रजांनी तो तिथून शिकून त्याला पोलो असे नाव दिले आणि आता सर्वात महत्वाचा मुद्दा म्हणजे क्रिकेट. आज क्रिकेटला जरी इंग्रजांचा खेळ म्हटले जात असले तरी अनेक इतिहासकारांच्या मते क्रिकेटचे मूळ हे आपल्या गली-बोळात खेळल्या जाणाऱ्या गिल्ली-दंडामध्ये आहे. गिल्ली-दंडामध्ये जसा एक लहान लाकडी तुकडा म्हणजे गिल्ली आणि एक मोठी काठी म्हणजे दंडा असतो, अगदी त्याच धर्तीवर क्रिकेटमध्ये छोटा चेंडू आणि मोठी बॅट आहे. गिल्ली-दंडात जसे गिल्लीला मारून अंतर मोजले जाते तसेच क्रिकेटमध्ये चेंडूला मारून धावा घेतल्या जातात. इंग्रजांनी याच संकल्पनेला अधिक शिस्तबद्ध रूप दिले. लाकडी दंड्याची जागा सपाट बॅटने घेतली, गिल्लीची जागा चामड्याच्या बॉलने घेतली आणि मातीच्या खड्ड्याऐवजी स्टंप उभारले गेले. म्हणजेच आपल्या गावाकडच्या खेळालाच नियमांच्या चौकटीत बसवून त्यांनी क्रिकेट बनवले आणि तो जगभर पसरवला. आज तोच खेळ आपल्याकडे धर्म म्हणून पूजला जातो. म्हणूनच हे लक्षात घेतले पाहिजे की भारत हा फक्त मसाल्यांचा किंवा योगाचा देश नव्हता, तर तो जगाला खेळ शिकवणारा क्रीडागुरूही होता. आपण आपल्याच खेळांकडे दुर्लक्ष केल्यामुळे आज त्यांच्यावर विदेशी शिक्का लागला आहे.

## रिकामे घडे

एका गावात दोन शेतकरी राहत होते. एक होता राम - खूप मेहनती, पण कमी बोलणारा.

दुसरा होता श्याम - काम कमी आणि बढाई जास्त मारणारा. एकदा गावात दुष्काळ पडला. रामने शांतपणे आपल्या शेतात नवीन विहीर खोदली. दिवस-रात्र मेहनत केली. तर श्याम गावभर फिरून सांगत होता, मी अशी शेती करेन, तशी करेन, माझ्याइतका हुशार कोणी नाही.

काही महिन्यांनी रामच्या विहिरीला भरपूर पाणी लागले. त्याचे शेत हिरवेगार झाले. आणि श्यामचे शेत बडबड करण्यातच वाळून गेले. तेव्हा गावचे पाटील म्हणाले, बघितलंत का? रिकामे घडे जास्त वाजतात.

ज्याच्याकडे ज्ञान आणि गुण कमी, तोच जास्त आवाज करतो. खरा गुणी माणूस रामसारखा शांतपणे आपले काम करत असतो.

तात्पर्य : कमी ज्ञान असलेले लोक जास्त बढाई मारतात, तर ज्ञानी माणूस शांत आणि नम्र असतो.

# आत्मशक्ति



## अनुभवांच्या आठवणी

त्यास पवित्र त्रिमूर्तींचे रहस्य समजून घेण्याची संधी मिळाली ह्या शेवटच्या अनुभवाने केवळ त्यांच्या हृदयात एवढी म धुरता भरली की, त्या अनुभवांच्या आठवणीने त्यांच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागत. एकदा का आम्ही ह्या अमृतरसाचे पान केले की आम्ही अनंत अशा धुंदीने भरून जातो. संत दर्शनसिंहजी महाराजांनी ह्या विषयावर अनेक पुस्तके लिहीली आहेत. ते म्हणतात की अशा आत्म्याची काय स्थिती होत असेल जेव्हा तो परत ह्या जगात येऊन आपले जीवन जगतो, तो त्या सुखाला, त्या आनंदाला आणि त्या धुंदीला कसा काय विसरणार? जी मानवाच्या समजण्या पलिकडची गोष्ट आहे?

संत कृपालसिंहजी महाराज म्हणत असत, जेव्हा ते सुख, तो आनंद मिळतो तेव्हा बाकी सारे आनंद आम्ही विसरून जातो हा आनंद सदैव आम्हाला देहभावातीत करतोआत्मिक आनंद हा इतका बलशाली असतो की मनुष्य ह्या जगातील दुःख वेदनांना भोगूनही आनंदात राहतो. ही गोष्ट विरोधाभासी वाटते आणि समजण्यास कठीण आहे. ही गोष्ट समजावी म्हणून आम्ही वेदनाशामक औषधांचा विचार करावा. वेदनाशामक औषधामुळे आपल्या शरीरात दुःख असूनही आपणास त्याची जाणीव होत नाही. आपल्या शरीरात दुःख तसेच असते पण त्या औषधी त्या दुःखाचे संदेश आमच्या मेंदूपर्यंत जाऊ देत नाही. त्यामुळे आम्हाला वेदना जाणवत नाही अथवा त्या विसरून जातो. जरी ही उपमा तेवढीशी समर्पक नसली तरीही परिस्थितीचे आकलन होण्यास तिची मदत होईल.

जसे एका बाजूस आपणास भौतिक दुःखाची बाधा चालू असते, दुसऱ्या बाजूने अंतरीय आनंद तुम्हाला सुख पोहोचवतो. ज्यामुळे तुमच्यावर बाह्य दुःखाचा परिणाम होत नाही. संत कबीर साहेब म्हणतात-सबै रसायन मै किया, प्रेम समान न कोय। रत्ती एक तन में संचरै, सब तन कंचन होय ।।

अर्थ- मी सर्व औषधी वापरली पण प्रेमासारखी कोणतीच नाही. जेव्हा प्रेम शरीराच्या एका भागापासून सुरु होते तर सारे शरीर सोने बनते.अविलाच्या संत टेरेसा यांनी ह्या स्थितीचे वर्णन मोठ्या बहारदार

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

## त्यांची वेदना

शिवानीदीदी : लहान बाळाकडे बघा. कधीकधी ते झोपेत हसतं, कधी रडतं. कारण त्याला पूर्वायुष्यातील घटना आठवतात. दुसरं म्हणजे, त्याच्या पूर्वायुष्यातील कुटुंबाकडून - या आत्म्याच्या जाण्याने दुःखात असलेले आत्मे - त्याला वेदनेची स्पंदनं मिळत असतात. ते अजून या दुःखातून बाहेर पडलेले नसतात. समजा, एखाद्या लहान बाळाने शरीर सोडलं, तर त्याचे पालक अनेक वर्ष या धक्क्यातून बाहेर पडू शकत नाहीत. म्हणून, आपल्या घरात जन्माला येणारा आत्मा हा वेदनेत आहे हे लक्षात ठेवायलाच हवं आणि आता त्याला इतकं प्रेम आणि शक्ती मिळायला हवी की तो बरा होईल. पण जर वर्तमानातही त्याला ताणतणाव अनुभवायला मिळणार असतील तर त्याला कसं वाटेल ? म्हणूनच, त्याचं खाणं आणि स्वच्छता या बाबत फार चोखंदळ राहायला नको. हे घटक बाळाच्या आरोग्यासाठी आणि स्वच्छतेसाठी महत्त्वाचे आहेत पण त्यामुळे वादाची, रागाची आणि दुखावलं जाण्याची नकारात्मक स्पंदनं निर्माण होणं परवडणारं नाही. आपण बाळाला शुद्ध आणि शक्तिशाली स्पंदनंच द्यायला हवीत. ही त्याच्याप्रति आपली जबाबदारी आहे. आजकाल, बाळाला खाणं भरवताना आपण टी.व्ही. किंवा फोन किंवा आयपॅड देतो. या गोष्टी त्याच्यासाठी नुकसानकारक आहेत.

सुरेश ओबेरॉय : पालक म्हणतात की अशा गोष्टींनी त्यांचं लक्ष दुसरीकडे वळवलं नाही तर मुलं खात नाहीत.

शिवानीदीदी : पण जेव्हा आपण लहान होतो तेव्हा अशी कुठलीच यंत्रं नव्हती. आजही अनेक घरांत या वस्तू नसतात. त्या घरांतली मुलं खात नाहीत का ? शास्त्रीय संशोधनानुसार मुलांना त्यांच्या बालपणात या यंत्रांची सवय लावू नये. आपण त्यांना यंत्रांची जेवढी जास्त सवय लावू तेवढे ते त्यांच्या उपजत गुणांपासून लांब जातील. यंत्रांचा वापर करायला लागल्यापासून आपण - मोठे लोकही आपली उपजत क्षमता आणि अंत:प्रेरणेची शक्ती विसरलो आहोत. मूल तर अजून लहान आहे आणि वाढीच्या वयात आहे.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बायको म्हणाली, माझं ऐकत का नाही?
नवरा म्हणाला, ऐकतो गं, पण समजून घेत नाही!
बायको म्हणाली, म्हणजे?
नवरा म्हणाला, तेच तर माझं लग्नानंतरचं शहाणपण आहे!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* जगात सर्वात जास्त पाऊस कोठे पडतो?

– मौसिनराम, मेघालय

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

## कडधान्ये

मोड आणल्यामुळे कडधान्याची पौष्टिकता वाढून त्यामधील पिष्टमयता व उष्मांक कमी होतात व त्यातील प्रथिने, खनिजे व जीवनसत्त्वे पचायला सोपी होतात. त्यामध्ये असणारी जीवनसत्त्वे दुप्पट ते तिप्पट प्रमाणात वाढतात. मोड आणल्याने कडधान्यामुळे होणारा वातप्रकोप कमी होतो व फायबरची निर्मिती जास्त प्रमाणात झाल्यामुळे पोट साफ राहण्यास मदत होते. त्याचबरोबर लोहाचे व कॅल्शिअमचे शोषण शरीरात जास्त प्रमाणात होण्यास मदत होते.

उडीद शरीरास अत्यंत पौष्टिक असे कडधान्य आहे. शाकाहारी लोकांसाठी मांसाहाराची उणीव भरून काढणारे त्याच गुणधर्माचे हे कडधान्य आहे. मराठीमध्ये 'उडीद', संस्कृतमध्ये 'माषः', इंग्रजीमध्ये 'ब्लॅक ग्रॅम', तर शास्त्रीय भाषेमध्ये 'व्हिग्ना मुंगो' या नावाने ओळखले जाणारे उडीद 'पॅपिलिओनेसी' या कुळातील आहे. उडदाचे पीक पावसाळ्याच्या सुरुवातीस घेतले जाते. याचे रोप मुगाच्या रोपासारखेच असते.

साधारणतः याचे रोप हातभर उंचीने वाढते. याच्या शेंगा सुकल्यानंतर रोप कापून शेंगा सुकविल्या जातात व त्यातून उडदाचे दाणे काढले जातात. उडीद भारतात सर्वत्र कमी अधिक प्रमाणात पिकविला जातो.

याचे दाणे काळ्या रंगाचे असतात. परंतु डाळ मात्र रंगाने पांढरीशुभ्र असते.महाराष्ट्रात कष्टकरी लोकांचा उडदाची आमटी व बाजरीची भाकरी हा आवडता आहार आहे. तर उत्तर व दक्षिण भारतात इडली, डोसा, उत्तप्पा, मेदूवडा, पापड, आमटी यांसाठी उडदाच्या डाळीचा वापर केला जातो.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# प्रभाग क्रमांक १७ मधील अंतर्गत रस्त्यांच्या काँक्रीटीकरणाचा शुभारंभ

नगर – प्रभाग क्रमांक १७ मधील अमरधाम ते भुतारे डेकोरेटर गोडाऊन तसेच गाडीलकर भट्टी (लोखंडी पुलाजवळ, मल्हारचौक) परिसरातील अंतर्गत रस्त्यांच्या काँक्रीटीकरणाच्या कामाचा भूमिपूजन सोहळा महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते पार पडला. नगरसेवक मयूर बांगरे यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नातून आणि पाठपुराव्यामुळे या महत्त्वपूर्ण रस्त्याच्या कामाला मंजुरी मिळून प्रत्यक्ष कामाचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले.


प्रभाग क्रमांक १७ मधील अंतर्गत रस्त्यांच्या काँक्रीटीकरणाचा शुभारंभ करताना महापौर ज्योती गाडे. समवेत नगरसेवक मयूर बांगरे, मनोज कोतकर, नगरसेविका अश्विनी लोंढे, जालिंदर कोतकर, सुमित लोंढे, संभाजी पवार, निलेश बांगरे आदी.

महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या, शहराचा विकास हा केवळ मोठ्या रस्त्यांपुरता किंवा प्रमुख चौकांच्या सुशोभीकरणापुरता मर्यादित नसतो. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेले अंतर्गत रस्ते, पाणी, स्वच्छता, ड्रेनेज, प्रकाश व्यवस्था आणि इतर मूलभूत सुविधा सक्षम करणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. प्रभाग क्रमांक १७ मधील नागरिकांची अनेक दिवसांपासून अंतर्गत रस्त्यांच्या दुरवस्थेबाबत मागणी होती. पावसाळ्यात चिखल, पाणी साचणे आणि वाहतुकीला होणारा त्रास यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. ही समस्या लक्षात घेऊन नगरसेवक मयूर बांगरे यांनी सातत्याने पाठपुरावा केला आणि अखेर या रस्त्याच्या काँक्रीटीकरणाच्या कामाला सुरुवात होत आहे. या कामामुळे नागरिकांना वर्षानुवर्षे भेडसावणाऱ्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा मिळण्यास मदत होईल.

नगरसेवक मयूर बांगरे म्हणाले, प्रभाग क्रमांक १७ मधील नागरिकांसाठी अंतर्गत रस्त्यांचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा होता. अमरधाम ते भुतारे डेकोरेटर गोडाऊन आणि गाडीलकर भट्टी परिसरातील रस्त्यांची दुरवस्था लक्षात घेऊन नागरिकांनी या रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्याची मागणी केली होती. नागरिकांची ही मागणी केवळ ऐकून न घेता ती प्रत्यक्षात आणण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. शहराचे आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभागाचा विकास आणि आज महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते भूमिपूजन होत असल्याचा मनस्वी आनंद आहे.

नगरसेवक मनोज कोतकर म्हणाले, प्रभागातील नागरिकांना चांगले रस्ते, पाणी, स्वच्छता, प्रकाश व्यवस्था आणि इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही लोकप्रतिनिधी म्हणून आपली जबाबदारी आहे. अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था झाल्याने नागरिकांना विशेषतः पावसाळ्यात मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. या रस्त्याचे काँक्रीटीकरण झाल्यानंतर नागरिकांची मोठी गैरसोय दूर होणार आहे.

नगरसेविका अश्विनी लोंढे म्हणाल्या, प्रभागातील खराब रस्त्यांचा सर्वाधिक त्रास महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी आणि पादचाऱ्यांना सहन करावा लागत होता. पावसाळ्यात रस्त्यावर चिखल आणि पाणी साचल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत होती. त्यामुळे या रस्त्याचे काँक्रीटीकरण होणे ही परिसरातील नागरिकांसाठी अत्यंत समाधानाची बाब आहे. यावेळी जालिंदर कोतकर, सुमित लोंढे, संभाजी राजे पवार, निलेश बांगरे, भागवत कुरधने, संजय गाडीलकर, अनेक बोरुडे, मनोज कवडे, दुर्गाताई कांबळे, सुभाष कांबळे यांच्यासह परिसरातील ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# प्रेरणादायी अक्षरधन

## नको अपयशाची भिती




संकलन: दिशान फिचर्स

एकदा का अपयश आले, की वाटते यापेक्षा बरे विष । विष एकदाच मारते. अपयश पदोपदी मृत्यूचा अनुभव देते. न ये मरण, न होय यातनांचे हरण। अपयशाचे प्रहार दारुण। शत्रू तर नव्हतेच कधी आपले. पण अपयशामुळे आपलेदेखील दुरावले । स्वतःचे स्वतःशीच भांडण जुंपले. मी केले ते का केले? आणि जे न केले त्याला काय कारण घडले ? या प्रश्नांच्या द्वंदात माझे मनच माझे वैरी झाले ।

पण अरे माणसा, एवढा धीर सोडायचा ? स्वतः देखील स्वतःला दोष द्यायचा? की मनाचा समतोल राखायचा ? अपयशांच्या कारणांचा शोध घ्यायचा. सावधानता राखून पुन्हा जोमाने प्रयत्न करायचा. विवेकाचा हात धरायचा, धैर्याला नेता मानायचा. कौल घ्यायचा अंतरात्म्याला विचारच नको इतर कुणाचा. इतर सगळे तुमच्या यशाचे सोबती. अपयश आले, की ते सोडोनि जाती.

कुणी का कधी माणसाशी नाते जोडते ? छे, माणसाला मिळालेल्या यशाशी ते आपोआप जुळते. मग सगळ्यांना तुमची मैत्री हवी असते. आप्तांना तुमचे विसरलेले नाते आठवते। पण तेच अपयश आले तर? कोण येते तुमच्याबरोबर? सगळे करतात जर, तर म्हणून इतरांचे हे सगळे संबंध तरवर । तुझ्या संगती फक्त तुझा अंतरीचा ईश्वर । त्याला स्मरावे वरचे वर ।

महानुभावपंथी महदंबा आपल्या धवळ्यातून सांगते तो हाच भावार्थ, की नको अपयशाची भीती। श्रीकृष्णाप्रती प्रीती। सतत राखता। तो हृदयीचा ईश्वरु । भक्तां भावेल रुख्मिणीसह । वरिता सर्वेश्वरु। यश देई.

पण पुष्कळदा वाटते, यश पदरी आले, पण त्याच्यासोबतच अपयश भोवले तर? जननिंदा टाळण्यात रामचंद्रांना यश आले, पण पतिव्रता सीतेला अनाथ करुन वनात सोडली, त्या अपयशाचे काय झाले? त्या अपयशामुळे यश काळे पडले। पण पुष्कळदा यश किंवा अपयश मानण्यातच माणसाची चूक होते. केवळ स्वतःच्या मनाप्रमाणे न घडले तर ये अपयश ठरते? उलट ज्याला जे हवे ते लाभो, असे ज्ञानेश्वर माउली म्हणते. पण माणसाला आपल्या मनाप्रमाणे व्हावे, हेच यश वाटते।

एक मजेदार कहाणी आहे. एकाचा मुलगा गणितात खूप हुशार होता. मोठमोठ्या बेरजा तो चुटकीसरशी करी. हा मोठा संशोधक होईल. असे लोक म्हणीत, पण वडिलांना मुलांचे हे कृत्य वेडेपणाचे वाटे. त्याचे लक्ष गणितातून कमी करण्याचा आपण प्रयत्न करावा, असे त्यांच्या मनाने घेतले. पण त्यासाठी काय करावे? त्यांनी ठरवले, की याला नाटकाला न्यावे. त्यात रमवावे, हा रमला, की गणित तात्पुरता का होईना, विसरेल । हे केवढे आपले यश? मग असे नाटक, संगीत, नृत्य या कलेत त्याला रमवू, असा विचार करुन त्यांनी मुलाला एका गाजलेल्या विनोदी नाटकाला नेले.

नाटक रंगत होते. मुलगाही एकाग्रपणे पाहत होता. लक्ष देउन ऐकत होता. वाहवाह म्हणून टाळी देत होता. वडील सुखावले. गणितातून मुलाचे लक्ष दुसरीकडे नेण्यात यश आले म्हणून खुश झाले. पहिला अंक संपला. मुलाला त्यांनी लगेच पहिल्या अंकाबद्दल विचारले. मुलगा म्हणाला, नाटककाराची कमाल आहे. प्रत्येकाच्या संभाषणात मोजून पाचशे सदुसष्ट शब्द होते। पहिल्या अंकात तीन प्रवेश झाले. प्रत्येक प्रवेशात मोजून सात हजार नउशे प्रेपत्र शब्ध होते।

– किशोर गांधी

# धोंडेवाडीत श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्सव व दहीहंडी सोहळ्याचे आयोजन

नगर – नगर तालुक्यातील धोंडेवाडी (वाळकी) येथे भगवान श्रीकृष्ण मंदिरात श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्सव व दहीहंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. ४ सप्टेंबर व ५ सप्टेंबर रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून भाविकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

४ सप्टेंबर रोजी सकाळी ६ ते ८ वा. गीता पारायण, सकाळी १० ते ११ वा. मंगलस्नान, सकाळी ११ ते १२ वा. विडा अवसर, दुपारी १२ वा. महाआरती, सायंकाळी ६ वा. महाप्रसाद तसेच रात्री ९ ते ११.३० वा. ह.भ.प. बाबा महाराज झेंडे (चिखली) यांचे प्रवचन होणार आहे. रात्री १२ वा. श्रीकृष्ण जन्मोत्सव साजरा करण्यात येणार आहे.

५ सप्टेंबर रोजी पहाटे ५ वा. प्रासादिक आरती, सकाळी ६ ते ८ वा. गीता पारायण, दुपारी १२ वाजता महाआरती, सायंकाळी ५ वा. दहीहंडी व सायंकाळी ७ ते ८ वा. महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. हा उत्सव प.पू.श्री. मुनिराज बाबा वानकर (जावळे नाना), भगवान श्रीकृष्ण मंदिर देवस्थान समिती, धोंडेवाडी (वाळकी), शिवसंभाजी युवा प्रतिष्ठान धोंडेवाडी तसेच विविध सामाजिक व धार्मिक संस्थांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला आहे.

उत्सवाच्या निमित्ताने मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार असून परिसरातील भाविकांनी उपस्थित राहून धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.


'स्वकुळसाळी हितसंवर्धक मंडळा'च्या वतीने उपमहापौर धनंजय जाधव यांचा सत्कार करताना पदाधिकारी.

# उपमहापौर धनंजय जाधव यांनी घेतले भगवान जिव्हेश्वरांचे दर्शन

नगर – अहिल्यानगर शहरात पार पडत असलेल्या भगवान जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त उपमहापौर धनंजय जाधव यांनी बागडपट्टी येथील भगवान जिव्हेश्वर मंदिरात जाऊन दर्शन घेतले. भगवान जिव्हेश्वर चरणी नतमस्तक होत त्यांनी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी, सकल साळी समाज बांधवांच्या तसेच नागरिकांच्या निरंतर आरोग्यासाठी, सुख–समृद्धीसाठी प्रार्थना केली.

यावेळी 'स्वकुळसाळी हितसंवर्धक मंडळा'च्या वतीने धनंजय जाधव यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी जितेंद्र लांडगे, विक्रम पाठक, प्रशांत मडके, विजय मानकर, नीरज चांगटे, प्रविण जुंदरे, अविनाश पावले, योगेश पांढरपोटे आदींसह समाजबांधव उपस्थित होते.

# गणेशोत्सव उत्कृष्ट देखावा स्पर्धेला गणेश मंडळांचा प्रतिसाद

## विचार भारती, चंद्रा एजन्सी व बन्सीमहाराजचे संयुक्त आयोजन

नगर – १४ सप्टेंबर पासून सुरु होणाऱ्या गणेशोत्सवानिमित्त अहिल्यानगरच्या विचार भारती, चंद्रा एजन्सी व बन्सीमहाराजच्या संयुक्त विद्यमाने 'गणेशोत्सव उत्कृष्ट देखावा स्पर्धा २०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी प्रबोधनात्मक, ऐतिहासिक, हिंदू संकृती व भारतीय जीवनशैली, विकासात्मक आशा वेगवेगळे विषयांवर देखावे सादर करण्याचे आवाहन विचार भारतीच्या वतीने शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांना केले होते. या आवाहनाला बऱ्याच मंडळांनी प्रतिसाद दिला असून दिलेल्या विषयांना अनुसरून गणेशोत्सवात देखावा सादर करण्यासाठी तयारी सुरू केली आहे.

सार्वजनिक गणेश मंडळा बरोबरच घरगुती आरास स्पर्धेचेही आयोजन यंदा करण्यात आले आहे. दोन्ही विभागातील उत्कृष्ट देखाव्यांना पारितोषकांनी सन्मानित करण्यात येणार आहे, अशी माहिती विचार भारती गणेशोत्सव उत्कृष्ट देखावा स्पर्धा प्रमुख रवींद्र बारस्कर यांनी दिली.

विचार भारतीचे अध्यक्ष सुधीर लांडगे म्हणाले, शहरातील गणेशोत्सव पारंपरिक संस्कृतीला अनुसरून व तसेच डीजे मुक्त होण्यासाठी विचार भारती गेल्या ३ वर्षांपासून प्रयत्नशील आहे. त्यास आता चांगला प्रतिसाद मिळत आहे. गणेशोत्सवातील देखाव्यांद्वारे समाज प्रबोधन व्हावे या उद्देशाने विचार भारतीच्या वतीने काही विषय देखाव्यांसाठी देण्यात आले आहेत. यामध्ये भारतीय कुटुंब परंपरा – आदर्श समाज व्यवस्था, हिंदू परंपरा आणि पर्यावरण, विकसित भारतातील स्वयं रोजगाराचे महत्व, विकसित भारत आणि स्वयं अनुशासन, आत्मनिर्भर भारत व विश्व गुरु भारत, पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या स्वप्नातील सांस्कृतिक राष्ट्र, शहाजी महाराज यांची स्वराज्य प्रेरणा, स्वच्छ व हरित अहिल्यानगर ( संत गाडगे महाराज यांचा संदेश) व स्वास्थ्य आणि योग त्यातून स्वस्थ अहिल्यानगर. या विषयांना अनुसरून गणेश मंडळांनी आकर्षक देखावे, लघु नाटिकेचे जिवंत देखावे सादर करण्याचे आवाहन केले आहे. त्यास चांगला प्रतिसाद मिळत आहे.

सार्वजनिक देखावा स्पर्धेच्या बरोबरीने घरगुती गणेशोत्सव देखावा स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी नागरिकांनी आपल्या घरातील गणपतीपुळे समाज प्रबोधन तसेच वरील विषयांना अनुसरून छोटे देखावे सादर करावेत. या देखाव्यांचे परीक्षण विचार भारतीचे परीक्षक करून उत्कृष्ट देखाव्यांना रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत.

अधिक माहितीसाठी रवींद्र बारस्कर ९४२२२२१३३३, मध्य शहर भागासाठी राहुल जामगावकर ९९२२२२७८९९, सावेडी उपनगरसाठी अमित खामकर ७३८५१३१३१३, भिंगार साठी किशोर कटोरे ९०६७३०८०५० व केडगाव भागासाठी भरत ठुबे ९८८१५८८६००, घरगुती देखावा स्पर्धा संपत नलावडे ९८८१३७५५५५ व अनिकेत कौर ९०९०७०५०० यांच्याशी गणेश मंडळांनी व घरगुती देखावा केलेल्यांनी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# भक्ती म्हणजे संस्कार आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण करणारी शक्ती

## छायाताई फिरोदिया यांचे प्रतिपादन; जिल्हास्तरीय भक्ती सुमन स्पर्धेचे बक्षीस वितरण

नगर – भक्ती म्हणजे केवळ देवाचे नामस्मरण नाही, तर आपल्या मनात चांगले विचार, संस्कार आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण करणारी शक्ती आहे. आणि हीच भक्ती जेव्हा सुंदर स्वरातून व्यक्त होते, तेव्हा त्याला एक वेगळेच सौंदर्य प्राप्त होते. आजच्या या भक्ती गीत स्पर्धेत विद्यार्थ्यांना केवळ गाण्याची संधीच नव्हे तर आपल्या संस्कृतीशी, संत परंपरेशी आणि आपल्या समृद्ध अध्यात्मिक वारसाशी जोडले जाण्याची संधी मिळाली आहे. असे प्रतिपादन अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांनी केले.



अहमदनगर एज्युकेशन सोसायटी आयोजित जिल्हास्तरीय भक्ती सुमन स्पर्धेच्या यशस्वी स्पर्धकांना पारितोषिक देऊन गौरविताना प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, प्रमुख अतिथी डॉ.धनश्री खरवंडीकर आणि इतर पदाधिकारी.

अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय भक्ती सुमन स्पर्धेच्या बक्षीस वितरण प्रसंगी त्या बोलत होत्या. संस्थेच्या अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मिडीयम स्कूलच्या सभागृहात ही स्पर्धा संपन्न झाली. स्पर्धेचे उद्घाटन सकाळी दीप प्रज्वलन करून छायाताई फिरोदिया, विश्वस्त सुनंदा भालेराव, गायक पवन नाईक, माजी प्रथम क्रमांक विजेती स्पर्धक सरोज पालडिया यांनी केले. छोटा आणि मोठा अशा दोन गटात झालेल्या या स्पर्धेत ५० पेक्षा जास्त स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.

सायंकाळी या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला. त्यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. धनश्री खरवंडीकर, संस्थेचे विश्वस्त ड.किशोर देशपांडे, ॲड. गौरव मिरीकर, सल्लागार भूषण भंडारी, मीनाताई बोरा, हेमंत मुथा यांसह भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे मुख्याध्यापक कैलास साबळे, रूपी बाई बोरा न्यू इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक रविकिरण भांड, अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मिडीयम स्कूलचे मुख्याध्यापक प्रभाकर भाबड,अध्यापक विद्यालय प्राचार्य संदीप उबाळे उपस्थित होते.

स्पर्धेतील निकाल–छोट्या गटात प्रथम क्रमांक बेडेकर आरोही प्रसाद, द्वितीय क्रमांक नातू कौशिक प्रफुल्ल, तृतीय क्रमांक ढेपे स्वरूप अविनाश, उत्तेजनार्थ पळसकर अवनी समीर, परदेशी मुलांशू सुशील, म्हसे रिषभ योगेश यांनी सुयश संपादन केले. मोठ्या गटात प्रथम क्रमांक कोरडे अथर्व रत्नाकर, द्वितीय क्रमांक कुलकर्णी ईरा अभिजीत, तृतीय क्रमांक कुलकर्णी वरदा धनंजय, उत्तेजनार्थ निसाळ तन्वीर चंद्रशेखर, लवलेकर आर्या सचिन, बोराडे श्रुती सुभाष यांनी यश संपादन केले.

विजेत्यांना सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र आणि रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. तर सर्व सहभागी स्पर्धकांचा संस्थेचे पदाधिकारी, शाळांचे मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक व संगीत, सामाजीक तसेच सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते सन्मान आले. या स्पर्धे चे परीक्षण संभाजीनगर येथील गजानन केचे, मनिषा फणसळकर, विश्वनाथ दाशरथे आदी मान्यवर गायक – गुरूजनांनी केले. पाहुण्यांचा परिचय रेणुका पुरंदरे यांनी करून दिला.प्रास्ताविक अपर्णा बालटे यांनी तर सूत्रसंचालन डॉ. वैदेही गायकवाड व स्नेहल झांबरे यांनी केले आभार यशश्री कुलकर्णी यांनी मानले. स्पर्धकांना संवादिनी – कल्याण मुरकुटे व गणेश बैरागी, तबला – हर्षद भावे व सुरज शिंदे तसेच टाळ, चीपळी – करताल साथ अच्युत घबाडे व कुलदीप चव्हाण यांची वाद्य साथसंगत लाभली.

# माणसे भिंगातून.. कथासंग्रहास राज्यस्तरीय संत ज्ञानेश्वर माऊली साहित्य पुरस्कार


नगर – के एस आय पब्लिकेशन्स कोल्हापूर यांचे ३० वे राज्यस्तरीय साहित्य संमेलन २३ ऑगस्ट रोजी आळंदी येथे संपन्न झाले. संमेलनाध्यक्ष पदी ज्येष्ठ साहित्यिक कवी दशरथ धायगुडे हे होते. संमेलनाचे निमंत्रक विलास पाटील, ज्येष्ठ साहित्यिक शंकर अंदानी, प्रमुख पाहुणे माया नवथर, साहित्यिक राजेंद्र फंड हे व्यासपीठावर विराजमान होते. सदर संमेलनमध्ये अहिल्यानगर मधील कथा लेखक बाळासाहेब देशमुख यांच्या 'माणसे भिंगातून...'या कथासंग्रहास.. 'राज्यस्तरीय संत ज्ञानेश्वर माऊली साहित्य पुरस्कार' संमेलनाध्यक्ष दादासाहेब धायगुडे, सिने अभिनेत्री चित्रा दीक्षित, ज्येष्ठ साहित्यिक शंकर अंदानी, विलास पाटील यांच्या हस्ते देण्यात आला.


बाळासाहेब देशमुख यांच्या माणसे भिंगातून..कथासंग्रहास राज्यस्तरीय संत ज्ञानेश्वर माऊली साहित्य पुरस्कार प्रदान करताना कवी दशरथ धायगुडे, सिने अभिनेत्री चित्रा दीक्षित आदी.

बाळासाहेब देशमुख यांचे आजवर, रंग माझा वेगळा, माणसे अशी.. अन् तशीही.., माणसे भिंगातून.. इत्यादी कथासंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. 'माणसे भिंगातून...' कथासंग्रहास साहित्यिक रंगनाथ वाडेकर, उपसंपादक संदीप जाधव यांची प्रस्तावना लाभलेली आहे. सदर कथासंग्रहाचे प्रकाशन २८ वे कवी सरकार राज्यस्तरीय साहित्य संमेलनमध्ये ज्येष्ठ साहित्यिक राजेंद्र फंड, व्याख्यात्या माया नवथर यांच्या शुभहस्ते करण्यात आले होते.

कथासंग्रास मिळालेल्या राज्यस्तरीय पुरस्काराबद्दल साहित्यिक सुनील गोसावी, सदानंद भणगे, इतिहास अभ्यासक नवनाथ वाव्हळ, बाबुराव उपाध्ये, ज्येष्ठ कादंबरीकार दिलीप कापसे, ज्येष्ठ कवी रूपचंद शिदोरे, डॉक्टर बाळासाहेब कोठुळे, ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ वाडेकर, शर्मिला गोसावी यांनी बाळासाहेब देशमुख यांचे अभिनंदन केले आहे.

# नगर तालुका तालीम सेवा संघाच्या अध्यक्षपदी नाना डोंगरे यांची निवड



नगर – नगर तालुका तालीम सेवा संघाच्या नवीन कार्यकारिणीला धर्मादाय उपायुक्तांची मान्यता मिळाली आहे. संघाच्या कार्यकारिणीची मुदत संपल्यानंतर अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांनी धर्मादाय उपायुक्तांकडे चेंज रिपोर्ट दाखल केला होता. या चेंज रिपोर्टला मंजुरी मिळाल्याने संघाच्या नवीन कार्यकारिणीचा मार्ग मोकळा झाला असून, पै. नाना डोंगरे यांची पुन्हा पाच वर्षांसाठी अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

नगर तालुका तालीम सेवा संघाची सन २०२४ मध्ये पाच वर्षांच्या कालावधीसाठी कार्यकारिणीची मुदत संपली होती. सदर कार्यकारिणीची मुदत पूर्ण झाल्यानंतर संघाच्या प्रशासकीय कामकाजाबाबत आवश्यक असलेला चेंज रिपोर्ट धर्मादाय उपायुक्त कार्यालयाकडे सादर करण्यात आला होता. या अहवालाची प्रक्रिया पूर्ण होऊन नवीन कार्यकारिणीला अधिकृत मान्यता मिळाली आहे. त्यामुळे संघाच्या आगामी कार्याला संस्थात्मक आणि कायदेशीर स्वरूपात महत्त्व प्राप्त झाले आहे.

नवीन कार्यकारिणीत कार्याध्यक्षपदी प्रतिभा डोंगरे, उपाध्यक्षपदी काशीनाथ पळसकर व संदिप डोंगरे, सचिवपदी बाळू भापकर, सहसचिवपदी प्रियंका डोंगरे, खजिनदारपदी किसन वाबळे, तर विश्वस्तपदी उत्तम कांडेकर यांची निवड करण्यात आली आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# जीनिअस कार एसी रिपेरिंग ॲण्ड मोटर्सच्या अत्याधुनिक सेवांचा विस्तार

नगर – शहरात गेल्या चार वर्षांपासून वाहनधारकांच्या विश्वासाला सार्थ ठरवत असलेल्या जीनिअस कार एसी रिपेरिंग अँड मोटर्स या सर्व्हिस सेंटरने आता आपल्या अत्याधुनिक सेवांचा विस्तार केला आहे. कारच्या इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक आणि मेकॅनिकल समस्यांवर अत्यंत दर्जेदार व विश्वासार्ह सेवा आता एकाच छताखाली उपलब्ध झाल्यामुळे वाहनचालकांची वेगवेगळ्या ठिकाणी होणारी धावपळ थांबली आहे.


जीनिअस कार एसी रिपेरिंग अँड मोटर्सच्या नूतनीकरण दालनाचे उद्घाटन करताना फैरोज इसाक सय्यद आणि याकूब वडागळे.

कारमध्ये निर्माण होणाऱ्या कोणत्याही तांत्रिक समस्येवर तातडीने आणि अचूक उपाय मिळावा, यासाठी या सेंटरमध्ये विविध सेवा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. कार एसी रिपेरिंग, कार वायरिंग, ईसीएम आणि बीसीएम रिपेरिंग, मीटर रिपेरिंग व की कोडिंग, कार सर्व्हिसिंग व कार ॲक्सेसरीज, इंजिन व सस्पेन्शन ओव्हरहॉलिंग अशा सुविधा आता एकाच छताखाली मिळणार आहेत. त्यासाठी या सेंटरमध्ये तब्बल १८ जणांची अत्यंत अनुभवी आणि कुशल टीम कार्यरत आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि प्रशिक्षित मनुष्यबळाचा योग्य मेळ घालून ग्राहकांना सर्वोत्तम सेवा देणे हेच आपले मुख्य ध्येय असल्याचे सेंटरच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे. मागील चार वर्षांत मिळवलेला ग्राहकांचा उत्स्फूर्त विश्वास हीच आपली सर्वात मोठी ताकद असल्याचे त्यांनी सांगितले.

जीनिअस कार एसी रिपेरिंग अँड मोटर्सच्या या नव्या विस्ताराचा आणि नूतनीकरणाचा उद्घाटन सोहळा नुकताच पार पडला. इंडिया ऑटो बॅटरीचे संचालक फैरोज इसाक सय्यद आणि कुनाल बॅटरीचे संचालक याकूब वडागळे यांच्या हस्ते या केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. या सेंटरची स्थापना नदीम शेख यांनी केली असून, या संपूर्ण प्रवासात मुदस्सिर खान यांचेही अत्यंत मोलाचे योगदान लाभले असल्याचे यावेळी सांगण्यात आले. यावेळी सुरेश रोहिडा, मनोज पुरशवानी, तसलीम खान, परवेझ शेख, शेख बशीर अहमद, निसार इनामदार, फैरोज खान, नज्रू फिटर, नजीर पठाण आणि रेहान खान आदी उपस्थित होते.

# क्रिकेट स्पर्धेत नगरच्या मुलींनी पटकावले अजिंक्यपद; उत्तर प्रदेश येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी संघाची निवड

नगर – टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र यांच्या वतीने राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या मैदानावर झालेल्या राज्य अजिंक्यपद टेनिस क्रिकेट स्पर्धेत अहिल्यानगरच्या मुलींच्या संघाने दमदार कामगिरी करत राज्य अजिंक्यपदाचे प्रथम क्रमांकाचे विजेतेपद पटकाविले. स्पर्धेतील उपांत्य फेरीत मुंबईच्या संघाचा पराभव केल्यानंतर अंतिम सामन्यात जळगावच्या संघावर दोन षटके राखून मात करत अहिल्यानगरच्या संघाने विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले.



राज्य टेनिस क्रिकेट स्पर्धेत अजिंक्यपद पटकावणारा मुलींचा संघ.

या विजयी संघात सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयातील तब्बल सात खेळाडूंचा समावेश होता. त्यामुळे विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. राज्य अजिंक्यपद स्पर्धेत अहिल्यानगरच्या संघाने सुरुवातीपासूनच उत्कृष्ट सांघिक खेळाचे प्रदर्शन केले. उपांत्य फेरीतील सामन्यात अहिल्यानगरच्या खेळाडूंनी मुंबईच्या संघाला पराभूत करून अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम सामन्यात जळगावच्या संघाविरुद्धही अहिल्यानगरच्या खेळाडूंनी फलंदाजी आणि गोलंदाजीत प्रभावी कामगिरी केली. अखेर जळगावचा दोन षटके राखून पराभव करत अहिल्यानगर संघाने राज्य अजिंक्यपद पटकाविले.

संघाच्या या विजयात कर्णधार नशरा सय्यद हिचे नेतृत्व महत्त्वपूर्ण ठरले. तिच्यासह राशी पवार, अमृता ढगे, धनश्री पवार, प्रणाली पानसंबळ, भक्ती गाडे, श्रावणी अडसुरे, आदिती ढोकणे आणि लक्ष्मीप्रिया म्हसे यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. अहिल्यानगरच्या विजयी कामगिरीमध्ये खेळाडूंच्या वैयक्तिक कामगिरीलाही विशेष दाद मिळाली. संघाची खेळाडू राशी पवार हिला स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट गोलंदाज म्हणून गौरविण्यात आले. तिच्या प्रभावी गोलंदाजीमुळे संघाला महत्त्वाच्या सामन्यांमध्ये निर्णायक फायदा झाला. तसेच अहिल्यानगरचीच अमृता ढगे हिला स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून गौरविण्यात आले. फलंदाजी, गोलंदाजी तसेच सांघिक खेळातील योगदानामुळे तिने स्पर्धेत विशेष छाप पाडली.

राज्य अजिंक्यपद पटकावणाऱ्या या खेळाडूंचे सावित्रीबाई फुले शिक्षण मंडळाचे अध्यक्ष तथा महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे, शिक्षण मंडळाचे सचिव महानंद माने, खजिनदार महेश घाडगे, विद्यालयाचे प्राचार्य अरुण तुपविहीरे, उपप्राचार्य बाळासाहेब डोंगरे, पर्यवेक्षक मनोज बावा, प्रा. जितेंद्र मेटकर, राहुरी कृषी विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी व क्रीडा अधिकारी डॉ. विलास आवारी, सहाय्यक कुलसचिव वैभव बारटक्के आदींनी अभिनंदन केले.

आगामी काळात उत्तर प्रदेशातील मथुरा येथे होणाऱ्या राष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धेसाठी सर्व विजयी खेळाडूंना मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. खेळाडूंना क्रीडाशिक्षक घनश्याम सानप तसेच एनसीसी प्रमुख संतोष जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.




सौ. अनघा अत्रे लिखित 'शब्दरंगी गुंफले' काव्यसंग्रहाचे प्रकाशन करताना ज्येष्ठ साहित्यिका डॉ. लिला गोविलकर. समवेत लेखिका सौ. अनघा अत्रे आदी.

## सौ. अनघा अत्रे लिखित 'शब्दरंगी गुंफले' काव्यसंग्रहाचे प्रकाशन

नगर – लीलावती प्रकाशन प्रकाशित सौ. अनघा विजय अत्रे / अरूणा बर्डे लिखित 'शब्दरंगी गुंफले' काव्यसंग्रहाचा (चित्रकाव्य) प्रकाशन सोहळा सावेडी येथील रावसाहेब पटवर्धन सभागृहामध्ये झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिका डॉ. लीलाताई गोविलकर होत्या. प्रमुख अतिथी बालरोगतज्ञ डॉ. विवेक देशपांडे, स्त्रीरोग तज्ञ सौ. साधना देशपांडे यांच्या उपस्थितीत तसेच मित्र परिवार यांच्या समवेत उत्साहात झाला.

डॉ. गोविलकर यांनी चित्र काव्याचे वेगळेपण काव्यसंग्रहातील काव्याआधारे स्पष्ट केले तर डॉ. विवेक देशपांडे यांनीही काव्यसंग्रहातील काव्यपंक्तीच्याआधारे आपली साहित्याविषयीची आवड प्रभावी शब्दांतुन व्यक्त केली. त्यांच्या पत्नी सौ. साधना देशपांडे यांनीही चित्र व काव्य यांच्यातील रसिकता व्यक्त करून अत्रे कुंटूबियांबद्दलची आत्मीयता व्यक्त केली. सौ. अत्रे यांनीही आपल्या काव्यलेखनामागची प्रेरणा स्पष्ट करून गुरूजनांच्या डॉ. गोविलकर, डॉ.सु.प्र. कुलकर्णी, पु. रा. देशपांडे यांच्या बद्दलची कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी राहुल अत्रे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन श्रीमती निर्मला नगरकर यांनी केले. सौ. शीतल आवटे यांनी आभार मानले.



डॉ दीपक यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण करण्यात आले.

# वृक्षारोपण व रक्तदान शिबिराने डॉ. दीपक यांचा वाढदिवस साजरा

नगर – साईदीप हॉस्पिटलचे चेअरमन डॉ. दीपक एस एस यांचा ७६ वा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी ज्यामध्ये वृक्षारोपण, रक्तदान शिबीर आयोजित करून साजरा करण्यात आला, अशी माहिती हॉस्पिटल संचालक डॉ. वेंकटेश मुळे यांनी दिली.

यावेळी सौ. ज्योती दीपक, डॉ. किरण दिपक, डॉ. वैशाली किरण, डॉ. अमित बडवे, डॉ. शैलेंद्र पाटणकर, डॉ. ऋषिकेश कालगांवकर, डॉ. सुनील दारंदले, इंजिनीर मुरलीधर बिहाणी, शरद झवर, विलास काळभोर इत्यादी उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना डॉ दीपक एस एस यांनी सांगितले की शरीर जरी दमले तरी मन मात्र कार्यरत राहिले पाहिजे आणि मी हेच ब्रीद कायम ठेवून या वयात ही रुग्णसेवा करीत आहे व शेवटपर्यंत करत राहणार असे 'ते म्हणाले यावेळी साईदीप हॉस्पिटलमधील डॉक्टर्स, नर्सेस व सर्व कर्मचारी उपास्थित होते.

# माजी न्यायमूर्ती बी.जी. कोळसे पाटील यांच्या हस्ते फुले पगडी प्रदान करत किरण काळेंचा पुण्यात गौरव

नगर – शांतता, मानवता, बंधुभाव आणि सामाजिक एकतेचा संदेश देणारे प्रेषित मोहम्मद पैगंबर (स.) यांच्या जयंतीचे औचित्य साधून ठाकरे शिवसेनेचे महानगर प्रमुख किरण काळे यांना समस्त मुस्लिम समाजाच्या वतीने पुण्यात श्रमिक पत्रकार भवन येथे माजी न्यायमूर्ती बी.जी. कोळसे पाटील यांचे हस्ते क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या विचारांची प्रतीकात्मक पगडी प्रदान करून सन्मानित करण्यात आले.



माजी न्यायमूर्ती बी.जी. कोळसे पाटील यांचे हस्ते किरण काळे यांना फुले पगडी प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी मूलनिवासी मुस्लिम मंचाचे अध्यक्ष अंजुम इनामदार, जमियत उलेमा हिंदचे हाफिज मुबशशीर, इक्बाल शेख, हाफिज अजमतुल्लाह खान, इब्राहिम यवतमाळवाला, मोईन शेख, ठाकरे शिवसेनेचे उपमहानगर प्रमुख मनोज गुंदेचा, माजी नगरसेवक संजय झिंजे, अल्पसंख्यांक आघाडीचे अनिस चुडीवाला, बांधकाम व्यावसायिक आय. बी. शहा आदींसह उपस्थित होते.

अहिल्यानगर ही संत, सुफी, महापुरुष आणि राष्ट्रीय एकात्मतेची पावन भूमी आहे. या शहराला ऐतिहासिक वारसा आहे. सर्व धर्मीय नागरिक येथे गुण्यागोविंदाने आणि एकमेकांच्या सणांमध्ये आनंदाने सहभागी होत आले आहेत. पण गेल्या दोन–तीन वर्षांमधील काही घटना पाहिल्यानंतर असे लक्षात येते की काही राजकीय लोक आपल्या राजकीय स्वार्थासाठी शहरातील वातावरण दूषित करू पाहत आहे. अहिल्यानगर मध्ये दंगल, हिंसाचार नको तर शांतता व सामाजिक सलोखा हवा, असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती बी. जी. कोळसे पाटील यांनी केले आहे.

### गुन्हेगाराला धर्म नसतो : काळे

सत्काराला उत्तर देताना किरण काळे म्हणाले, गुन्हेगाराला जात, धर्म नसतो. मानवता हाच खरा धर्म आहे. धीरज परदेशीची हत्या अत्यंत दुर्दैवी आहे. त्याच्या मारेकऱ्यांना फाशीचीच शिक्षा झाली पाहिजे. या घटनेच्या आडून काहींनी राजकीय पोळ्या भाजण्याचा प्रयत्न केला. धर्माच्या आधारे भावनिक राजकारण करण्याऐवजी विकासाच्या मुद्द्यावर राजकारण व्हायला हवं. नाशिक, छत्रपती संभाजीनगर मागून येऊन पुढे गेलं. पण अहिल्यानगर अजून ही आहे त्याच जुन्या स्थितीत आहे. आम्हाला शांततेच्या माध्यमातून विकास साधायचा आहे. व्यापार, उद्योग, शिक्षण, रोजगार याला चालना द्यायची आहे, असे काळे यांनी सांगितले.

# आकांक्षा अपंग पुनर्वसन केंद्राकडून दिव्यांगांना स्वयंरोजगार वस्तूंचे वाटप

नगर – जिल्ह्यातील ग्रामीण भागातील १० गरजू दिव्यांगांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी विविध स्वयंरोजगार उपयोगी साहित्यांचे वाटप दिव्यांगात्वावर मात करून स्वयंपूर्ण होत विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींच्या हस्ते झाले. अहिल्यानगर शहरातील आकांक्षा दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या वतीने संचालिका सविता काळे यांच्या प्रयत्नातून झालेल्या या दानयज्ञाने सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण होत त्यांना आत्मनिर्भरतेची नवी दिशा देण्यात आली.



आकांक्षा दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या वतीने संचालिका सविता काळे यांच्या प्रयत्नातून जिल्ह्यातील ग्रामीण भागातील १० गरजू दिव्यांगांना विविध स्वयंरोजगार उपयोगी साहित्यांचे वाटप करण्यात आले.

उपक्रमाची अधिक माहिती देताना सविता काळे यांनी सांगितले, दिव्यांग व्यक्तींना केवळ मदतीची गरज नसून त्यांच्यातील कौशल्याला, जिद्दीला संधी व प्रोत्साहन देण्यासाठी या संस्थेच्या माध्यमातून योगदान दिले जात आहे. दिव्यांगांना आत्म निर्भर व स्वावलंबनासाठी विविध स्वयंरोजगार उपयोगी साधने देऊन त्याचे प्रशिक्षणही दिले असल्याने त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यास मदत होणार आहे. या माध्यमातून आजपर्यंत अनेक दिव्यांगांचे पुर्नवसन झाले असून ते आज विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवत आहेत. आशा आत्मनिर्भर झालेल्या व्यक्तींच्या हस्ते गरजू लाभार्थ्यांना या वस्तूंचे वितरण करून प्रेरणा दिली आहे. दिव्यांगांच्या कल्याणासाठी केवळ सहानुभूती न दाखविता त्यांना सक्षम करण्यासाठी समाजातील विविध घटकांनी पुढाकार घेण्याची गरज असल्याच्या भावना त्यांनी व्यक्त केल्या.

या उपक्रमासाठी मुंबईचे विकास म्हात्रे व संगीता म्हात्रे यांनी (कै) रमेश व (कै) शैलजा पानसरे यांच्या स्मरणार्थ मोलाची मदत दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय दृष्टिहीन संघटनेचे पदाधिकारी गोरख दरंदले होते.

यावेळी प्रमुख पाहुणे दिव्यांगात्वावर मात करून स्वयंपूर्ण होत विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणारे सौदागर लोंढे, प्रतीक्षा काळे, अलका नेहूल, लक्ष्मी मडूर आदींच्या हस्ते दिव्यांग लाभार्थींना वस्तूंचे वाटप झाले.

या कार्यक्रमात अंबिका बोल्ली, शशिकांत जाधव व आशा जाधव यांना बॉलपेन मेकिंग मशीन, योगेश आव्हाड यांना किराणा भाजी विक्री शेड, आकाश अभंग यांना स्टेशनरी वस्तू विक्री शेड, शिवनाथ गीते व सबिना सय्यद यांना आटा चक्की मशीन, प्रवण पारखी यांना लॅपटॉप, बालाजी शिंदे व अंजली सूर्यवंशी यांना ऑनलाईन कामासाठी मोबाईल फोन आदी स्वयंरोजगार उपयोगी साहित्यांचे वाटप करण्यात आले.

सूत्रसंचालन अंजली सूर्यवंशी यांनी केले. गोरख दरंदले यांनी मनोगत व्यक्त करून आभार मानले.

## पैगंबर जयंतीनिमित्त बालघर येथे फळांचे वाटप

नगर – हजरत मोहम्मद पैगंबर जयंतीनिमित्त अल करम हॉस्पिटल व खिदमत सोशल फाउंडेशनच्या वतीने तपोवनरोड येथील अनाथ व निराधार विद्यार्थ्यांच्या बालघर प्रकल्पात फळांचे वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचा हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी अकीब इकबाल सय्यद, तौसिफ रेडियमवाला, हाफीज सय्यद अर्शद, शेख उसामा, तौफिक तांबोली, युवराज गुंड, आबीद दुलेखान,राजीक खान,सरफराज भाई, शेरअली शेख, एजाज तांबोली आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तौफिक तांबोली यांनी केले. प्रास्ताविक उसामा शेख यांनी केले, तर आभार अकीब इकबाल यांनी मानले.



आळंदी येथे कवी दत्तात्रय वारकड यांना संत ज्ञानेश्वर माऊली साहित्य पुरस्कार प्रदान करताना अभिनेत्री चित्रा दीक्षित व मान्यवर

# दत्तात्रय वारकड यांना संत ज्ञानेश्वर माऊली साहित्य पुरस्कार प्रदान

नगर – संत ज्ञानेश्वरांच्या पावन भूमी आळंदी येथे के.एस.ई. पब्लिकेशन, कोल्हापूर आयोजित ३० वे मराठी ग्रामीण साहित्य संमेलन उत्साहात पार पडले. ग्रामीण साहित्य, लोकसंस्कृती आणि मराठी भाषेच्या जतन व संवर्धनासाठी हे संमेलन प्रेरणादायी ठरले. संमेलनात मराठी चित्रपट अभिनेत्री चित्रा दीक्षित यांच्या हस्ते कवी, लेखक, प्रेरणादायी वक्ते व संत साहित्य अभ्यासक दत्तात्रय वारकड यांना 'संत ज्ञानेश्वर माऊली साहित्य पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

यावेळी संमेलनाचे अध्यक्ष दशरथ धायगुडे (सातारा), के.एस.ई. पब्लिकेशन्सचे संस्थापक विलास पाटील (कोल्हापूर), संमेलन स्वागताध्यक्ष प्रा. डॉ. सी.ए. शंकर अदानी, प्रमुख मार्गदर्शक प्रसिद्ध कादंबरीकार डॉ. श्रीकांत पाटील (घुणकी) तसेच महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील मराठी साहित्यिक, रसिक, कवी, लेखक, कथनकार उपस्थित होते.



मराठी लोककला जपणारा द फोक आख्यान कार्यक्रम अमेरिकेत सादर करताना कलाकार.

# अमेरिकेत मराठी लोककला जपणारा द फोक आख्यान कार्यक्रम अप्रतिम

नगर – छत्रपती फाउंडेशनच्या न्यू जर्सी राज्य युवती अध्यक्षा वैशाली मोरे यांनी नुकतीच द फोक आख्यानच्या कलाकारांची भेट घेऊन त्यांच्या अप्रतिम कार्यक्रमाचे कौतुक केले. महाराष्ट्राची समृद्ध लोककला, संस्कृती आणि परंपरा प्रभावीपणे सादर करणाऱ्या या टीमचे त्यांनी छत्रपती फाउंडेशनच्या वतीने अभिनंदन केले.

अमेरिकेत राहणाऱ्या मराठी नागरिकांना आपल्या मातीतील अस्सल लोककला अनुभवण्याची संधी मिळणे ही अत्यंत आनंदाची आणि भाग्याची गोष्ट आहे. द फोक आख्यानचा कार्यक्रम खरोखरच अप्रतिम आहे. कलाकारांनी आपल्या प्रभावी सादरीकरणातून महाराष्ट्राची संस्कृती आणि लोकपरंपरा जिवंत केल्या, असे वैशाली मोरे यांनी सांगितले.

परदेशात राहूनही महाराष्ट्राच्या लोककलेचा वारसा जपणे आणि तो नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे अत्यंत आवश्यक आहे. द फोक आख्यानच्या टीमने आपल्या दर्जेदार सादरीकरणातून अमेरिकेतील मराठी प्रेक्षकांना मायभूमीशी जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे, असेही त्यांनी नमूद केले.

आपली लोककला अशाच प्रकारे जपली जावी आणि ती जगभरातील अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचावी, अशी अपेक्षा वैशाली मोरे यांनी व्यक्त केली.

छत्रपती फाउंडेशनच्या वतीने त्यांनी द फोक आख्यानच्या संपूर्ण टीमचे अभिनंदन केले आणि पुढील सांस्कृतिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे ३० ऑगस्टला आयोजन

नगर – आपले आरोग्य... आमची जबाबदारी या संकल्पनेतून स्वकुळ साळी हित संवर्धक मंडळ, अहिल्यानगर, साईदीप सह्याद्री हॉस्पिटल्स आणि अहिल्यानगर महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने बागडपट्टी येथील जिव्हेश्वर सांस्कृतिक भवन येथे ३० ऑगस्ट रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरात सर्वसाधारण आरोग्य सल्ला, महिला आरोग्य तज्ञांचे मार्गदर्शन, रक्तदाब तपासणी, शुगर तपासणी,ईसीजी तपासणी, एक्स–रे तपासणी, रक्त तपासणी,आरोग्य समुपदेशन व सर्वसाधारण औषधे मोफत मिळतील. या शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी नीरज चांगटे मो.नं.८३२९०६५६२९ यांच्याशी संपर्क साधावा.

# नगरचे महंत अवघड पीर योगी बुद्धनाथजी महाराज यांची राष्ट्रीय योगी फोर्सच्या राष्ट्रीय प्रवक्तेपदी निवड

नगर – देशाची राजधानी दिल्ली येथे राष्ट्रीय योगी फोर्स या नव्या संघटनेची अधिकृत स्थापना करण्यात आली असून, देशभरात सामाजिक, शैक्षणिक व आरोग्य क्षेत्रात व्यापक स्वरूपात कार्य करण्याचा संघटनेचा संकल्प आहे. संघटनेचे संस्थापक महंत योगी रोहतास नाथजी महाराज यांनी याबाबत माहिती दिली. संस्थापक महंत योगी रोहतनाथजी महाराज आणि संस्थापक महंत योगी रुद्रनाथजी महाराज यांच्या उपस्थितीत संघटनेच्या केंद्रीय कार्यकारी समितीची घोषणा करण्यात आली.



दिल्ली येथे राष्ट्रीय योगी फोर्स या नव्या संघटनेची घोषणा करताना संस्थापक महंत योगी रोहतनाथजी महाराज आणि महंत योगी रुद्रनाथजी महाराज समवेत राष्ट्रीय प्रवक्ते अहिल्यानगर येथील महंत अवघड पीर योगी बुद्धनाथजी महाराज.

या समितीमध्ये राष्ट्रीय अध्यक्षपदी महंत योगी विकास नाथजी महाराज, राष्ट्रीय सचिवपदी महंत योगी पीर शिवनाथजी महाराज, राष्ट्रीय प्रवक्तेपदी अहिल्यानगर येथील महंत अवघड पीर योगी बुद्धनाथजी महाराज, राष्ट्रीय कोषाध्यक्षपदी धीरज नरवत आणि राष्ट्रीय महामंत्रीपदी मोनू यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

संघटनेच्या माध्यमातून देशातील विविध सामाजिक प्रश्नांवर कायदेशीर आणि सनदशीर मार्गाने काम करण्याचा मानस व्यक्त करण्यात आला आहे. विशेषतः शिक्षण आणि आरोग्य या दोन महत्त्वाच्या क्षेत्रांना प्राधान्य देण्यात येणार असून, समाजातील गरजू घटकांपर्यंत आवश्यक सेवा पोहोचविण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

संघटनेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या नागरिक व कार्यकर्त्यांसाठी लवकरच ऑनलाइन सदस्य नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. देशहित, सामाजिक बांधिलकी आणि सेवा कार्याच्या माध्यमातून संघटनेचे कार्य देशभर पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे राष्ट्रीय अध्यक्ष महंत योगी विकास नाथजी महाराज यांनी सांगितले.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## प्रकाशावर चालणारी महावेगवान मायक्रोचिप

आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या (एआय) शर्यतीत चीनने एक क्रांतिकारी शोध लावला आहे. चिनी शास्त्रज्ञांनी 'लाईटजेन' नावाची एक अनोखी मायक्रोचिप तयार केली आहे, जी विजेऐवजी थेट 'प्रकाशाच्या लहरींवर' काम करते. दावा केला जात आहे की, ही चिप काही विशिष्ट कामांमध्ये जगातील दिग्गज एनव्हीडिया कंपनीच्या चिपपेक्षा १०० पटीने अधिक वेगवान आणि वीज वाचवणारी आहे.

शांघाय जियाओ टोंग युनिव्हर्सिटी आणि सिंघुआ युनिव्हर्सिटीच्या टीमने ही चिप विकसित केली आहे. यामध्ये २० लाखांहून अधिक 'फोटोनिक न्यूरॉन्स' आहेत. ही चिप इमेज जनरेशन, स्टाईल ट्रान्सफर, फोटो क्लीनिंग आणि ३डी इमेजिंग यांसारख्या कामांसाठी डिझाईन केली आहे.





संशोधकांचा दावा आहे की, या कामांमध्ये ही चिप NVIDIA GPU च्या तुलनेत १०० पट वेगवान आहे. याशिवाय, सिंघुआ युनिव्हर्सिटीने 'अउउएड' नावाची एक हायब्रीड चिपही तयार केली आहे. ही चिप एका सेकंदात ४.६ पेटाफ्लॉप्स (लाखो-करोडो गणना) करण्याची क्षमता ठेवते. विशेष म्हणजे, ही चिप चीनच्या जुन्या आणि उपलब्ध सेमीकंडक्टर तंत्रज्ञानाचा वापर करूनही बनवता येते. ही चिप ठरावीक गणिती प्रक्रिया इतक्या वेगाने करते की, ते एखाद्या सुपरकॉम्प्युटरप्रमाणे वाटते. मात्र, ही सामान्य संगणक प्रोग्राम किंवा मोठे एआय मॉडेल ट्रेन करण्यासाठी वापरता येणार नाही.

**'लाईटजेन' चिपचे वैशिष्ट्य काय?**

सध्या एआयसाठी वापरले जाणारे NVIDIA चे GPU (उदा. A100) हे इलेक्ट्रॉन्स म्हणजेच विजेच्या प्रवाहावर चालतात. ते शक्तिशाली असले, तरी प्रचंड वीज खातात आणि लवकर गरम होतात. मात्र, चीनची ही नवीन चिप खालील कारणांमुळे वेगळी ठरते. यात विजेच्या तारांऐवजी प्रकाशाच्या कणांचा (फोटॉन्स) वापर करून गणिती प्रक्रिया केल्या जातात. जणू काही विजेच्या तारांऐवजी काचेच्या पाईपमधून प्रकाश धावत हिशोब करत आहे. प्रकाशाचा वेग प्रचंड असल्याने ही चिप अतिशय जलद काम करते आणि वीज कमी वापरत असल्याने ती गरम होत नाही. ही चिप 'मल्टिटास्किंग' नाही. म्हणजे ती एनव्हीडीयाप्रमाणे सर्व प्रकारची कामे करू शकत नाही, तर काही विशिष्ट कामांसाठीच तयार करण्यात आली आहे. ◆◆◆

## आता प्रकाश लहरींच्या मदतीने मेंदूला मिळणार 'आदेश'!



मेंदू आणि यंत्र यांच्यातील संवाद अधिक सुलभ करण्यासाठी शास्त्रज्ञांनी एक क्रांतिकारी पाऊल उचलले आहे. 'ब्रेन-मशिन इंटरफेस' (BMI) या तंत्रज्ञानाचा वापर करून आता थेट प्रकाशाच्या साहाय्याने मेंदूशी 'बोलणे' शक्य झाले आहे. उंदरांवर करण्यात आलेल्या प्रयोगांमध्ये या तंत्रज्ञानाला मोठे यश मिळाले असून, यामुळे भविष्यात मानवी आरोग्य क्षेत्रातील आव्हाने पेलण्यासाठी नवी आशा निर्माण झाली आहे.

निसर्गाने दिलेल्या डोळ्यांसारख्या इंद्रियांचा वापर न करता, हा नवीन वायरलेस डिव्हाईस (यंत्र) थेट मेंदूला माहिती पुरवतो. हे उपकरण अतिशय लवचिक आणि मानवी तर्जनीपेक्षाही लहान आहे. हे मेंदूच्या आत न बसवता केवळ टाळूच्या खाली बसवले जाते. यात ६४ सूक्ष्म एलईडी दिवे आणि एक रिसीव्हर अँटेना आहे. बाह्य अँटेनाद्वारे "NFC" (कॉन्टॅक्टलेस पेमेंटमध्ये वापरले जाते तसे तंत्रज्ञान) वापरून हे दिवे नियंत्रित केले जातात. या प्रयोगासाठी उंदरांच्या मेंदूतील पेशींमध्ये विशिष्ट अनुवांशिक बदल करण्यात आले होते, जेणेकरून त्या पेशी प्रकाशाच्या पॅटर्नला प्रतिसाद देतील.

प्रयोगादरम्यान, या उपकरणातून निघणाऱ्या प्रकाश लहरींना उंदरांच्या मेंदूने असा प्रतिसाद दिला, जणू काही ते माहिती डोळ्यांनी पाहत आहेत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, या उंदरांनी मेंदूतील या लहरींचे अर्थ समजून घ्यायला शिकले आणि प्रयोगशाळेत लपवलेले चविष्ट खाद्य शोधून काढण्याचे कठीण कार्य यशस्वीपणे पूर्ण केले. या संशोधनाचे प्रमुख लेखक आणि 'नॉर्थवेस्टर्न युनिव्हर्सिटी'चे बायोइलेक्ट्रॉनिक्स संशोधक जॉन रॉजर्स यांनी सांगितले की, 'हे तंत्रज्ञान मूलभूत संशोधनासाठी एक अत्यंत शक्तिशाली साधन आहे.

'हे उपकरण मऊ आणि लवचिक असल्याने डोक्याच्या हाडांच्या आकाराप्रमाणे जुळवून घेते. यामुळे भविष्यात जड वायरिंग किंवा मोठ्या बाह्य उपकरणांशिवाय मेंदूशी संबंधित आजारांवर उपचार करणे शक्य होऊ शकते. हे उपकरण ८ डिसेंबर रोजी 'नेचर न्यूरोसायन्स' या प्रसिद्ध नियतकालिकात प्रकाशित झालेल्या अभ्यासाचा भाग आहे. डोळ्यांसारख्या नैसर्गिक ज्ञानेंद्रियांना वळसा घालून थेट मेंदूला कृत्रिम माहिती पुरवण्याची ही क्षमता विज्ञानातील एक मैलाचा दगड मानली जात आहे. ◆◆◆

## दुर्मीळ सुवर्ण नाण्यांचा शोध



स्वित्झर्लंडमधील एका दलदलीच्या भागात सर्वेक्षण करत असताना दोन स्वयंसेवक पुरातत्त्व शास्त्रज्ञांना सोन्याची दोन अत्यंत दुर्मीळ नाणी सापडली आहेत. ही नाणी देशातील आतापर्यंत सापडलेल्या सर्वात जुन्या 'केल्टिक' नाण्यांपैकी असावीत, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. विशेष म्हणजे, ही नाणी प्राचीन काळी देवांना नवस किंवा अर्पण म्हणून अर्पण केली असावीत, अशी शक्यता संशोधकांनी व्यक्त केली आहे.

ही दोन्ही सुवर्ण नाणी साधारण २,३०० वर्षांपूर्वीची (इसवी सन पूर्व तिसऱ्या शतकाच्या मध्यकाळातील) आहेत. स्वित्झर्लंडच्या पुरातत्त्व विभागाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, 'ही नाणी स्वित्झर्लंडमध्ये सापडलेल्या सर्वात जुन्या केल्टिक नाण्यांच्या अत्यंत लहान गटाचा भाग आहेत, ज्यांची संख्या आतापर्यंत केवळ २० च्या वर आहे.' सापडलेल्या नाण्यांपैकी पहिले नाणे ७.८ ग्रॅम वजनाचे आहे. तर दुसरे नाणे १.८६ ग्रॅम वजनाचे आहे. 'स्टेटर' हा शब्द प्राचीन ग्रीक नाण्यांपासून आला आहे. इसवी सन पूर्व चौथ्या शतकाच्या शेवटी, युरोपमधील 'केल्टस' जमातीचे लोक भाडोत्री सैनिक म्हणून काम करत असताना त्यांना मोबदला म्हणून ग्रीक नाणी दिली जात असत. याच ग्रीक नाण्यांपासून प्रेरणा घेऊन त्यांनी तिसऱ्या शतकाच्या सुरुवातीला

स्वतःची नाणी तयार करण्यास सुरुवात केली. ही नाणी मॅसेडोनचा राजा फिलिप दुसरा (अलेक्झांडर द ग्रेटचे वडील) यांच्या काळातील सोन्याच्या नाण्यांची नक्कल करून बनवण्यात आली आहेत. नाण्याच्या पुढच्या बाजूला ग्रीक देव अपोलोची प्रतिमा आहे, तर मागच्या बाजूला दोन घोड्यांचा रथ दाखवण्यात आला आहे. मात्र, केल्टिक लोकांनी यात काही बदल केले होते. लहान नाण्याच्या मागच्या बाजूला घोड्यांच्या खाली 'ट्रिपल स्पायरल' हे चिन्ह दिसते, जे केल्टिक कलेचे वैशिष्ट्य मानले जाते. २०२२ ते २०२३ दरम्यान 'आर्किऑलॉजी बेसलँड' च्या स्वयंसेवकांना आरिसडॉर्फजवळील 'बेरेनफेल्स' दलदलीच्या भागात केल्टिक काळातील ३४ चांदीची नाणी सापडली होती. याच आधारावर व्होल्फगांग निडरबर्गर आणि डॅनियल मोना या दोन स्वयंसेवकांनी २०२५ च्या वसंत ऋतूत पुन्हा तपासणी केली असता त्यांना ही सोन्याची नाणी सापडली. ◆◆◆

## अंजिर खा, मधुमेह नियंत्रणात ठेवा!

मधुमेहाच्या रुग्णांसाठी रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवणे हे सर्वात मोठे आव्हान असते. अशा परिस्थितीत आहारात योग्य पदार्थांचा समावेश करणे अत्यंत आवश्यक आहे. आयुर्वेद आणि आहारतज्ज्ञ या दोघांच्या मते, अंजीर आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर आहे; कारण त्यामध्ये फायबर आणि आवश्यक पोषक तत्त्वे मुबलक प्रमाणात आढळतात. जर अंजीराचे सेवन योग्य पद्धतीने आणि मर्यादित प्रमाणात केले, तर ते डायबिटीज नियंत्रित ठेवण्यास मदतगार ठरू शकते.



अंजीरमध्ये फायबर, पोटॅशियम, कॅल्शियम, लोह, व्हिटॅमिन ए आणि बी यासारखी महत्त्वाची पोषक तत्त्वे असतात. यामध्ये असलेल्या फायबरमुळे पचनक्रिया योग्य गतीने होते, ज्यामुळे रक्तातील साखरेची पातळी अचानक वाढत नाही. मर्यादित प्रमाणात याचे सेवन करणे मधुमेह असलेल्या लोकांसाठी पूरक मानले जाते. अंजीरमधील अँटी-ऑक्सिडंट आणि अँटी-इन्फ्लेमेटरी गुणधर्म शरीरातील इन्सुलिनची कार्यक्षमता वाढवण्यास मदत करतात. नियमित आणि मर्यादित सेवनाने शरीरातील ग्लुकोज मेटाबॉलिजम (चयापचय क्रिया) सुधारण्यास मदत होऊ शकते. याव्यतिरिक्त, अंजीर शरीरातील खराब कोलेस्टेरॉल संतुलित राखण्यासाठीदेखील उपयुक्त ठरते. जरी अंजीर फायदेशीर असले, तरी मधुमेहाच्या रुग्णांनी आपल्या आहारात याचा समावेश करण्यापूर्वी डॉक्टरांचा किंवा तज्ज्ञांचा सल्ला नक्की घ्यावा. ◆◆◆

## चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर आढळला ऊर्जावान 'प्लाझ्मा'

भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने (इस्रो) चंद्राच्या पृष्ठभागाबाबत एक अत्यंत महत्त्वाची माहिती जगासमोर आणली आहे. 'चंद्रयान-३' मोहिमेतील 'विक्रम' लँडरवर बसवलेल्या RAMBH$A-LP या विशेष उपकरणाने चंद्राच्या दक्षिण ध्रुवाजवळ पृष्ठभागालगत प्रचंड ऊर्जेने भरलेल्या 'प्लाझ्मा'ची उपस्थिती नोंदवली आहे. इतक्या कमी उंचीवर चंद्राच्या प्लाझ्मा वातावरणाचा थेट अभ्यास करण्याची ही जगातील पहिलीच वेळ आहे.



२३ ऑगस्ट २०२३ ते ३ सप्टेंबर २०२३ या कालावधीत विक्रम लँडरने गोळा केलेल्या आकडेवारीच्या विश्लेषणानुसार, चंद्राच्या पृष्ठभागाजवळील विद्युत वातावरण पूर्वीच्या अंदाजापेक्षा कितीतरी पटीने अधिक सक्रिय आहे. RAMBH$A-LP उपकरणाचा मुख्य उद्देश चंद्राच्या पृष्ठभागाजवळील आयन आणि इलेक्ट्रॉनच्या (प्लाझ्मा) प्रमाणात होणारे बदल मोजणे हा होता. या अभ्यासामुळे दक्षिण ध्रुवीय अक्षांशांवर प्लाझ्माची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे स्पष्ट झाले आहे.

**'शिवशक्ती पॉईंट'जवळील आकडेवारी**

'इस्रो'ने दिलेल्या माहितीनुसार, 'चंद्रयान-३' जिथे उतरले त्या 'शिवशक्ती पॉईंट'जवळ इलेक्ट्रॉनची घनता प्रतिघन सेंटिमीटर ३८० ते ६०० इतकी आढळली आहे. हा आकडा आधीच्या अंदाजापेक्षा खूप जास्त आहे. तसेच, येथील इलेक्ट्रॉन्सचे तापमान ३,००० ते ८,००० केल्विन इतके नोंदवण्यात आले आहे, जे चंद्राच्या वातावरणातील सतत होणारे बदल दर्शवते.

**भविष्यातील मोहिमांसाठी महत्त्व**

'इस्रो'च्या शास्त्रज्ञांनुसार, चंद्राचे प्लाझ्मा वातावरण त्याच्या कक्षेनुसार बदलत असते. जेव्हा चंद्र पृथ्वीच्या चुंबकीय शेपटीतून (Magnetic Tail) जातो, तेव्हा पृथ्वीकडून येणारे प्रभारित कण या वातावरणात बदल घडवून आणतात.

या शोधामुळे भविष्यात चंद्रावर पाठवल्या जाणाऱ्या मानवी आणि रोबोटिक मोहिमांचे नियोजन करणे अधिक सोपे होणार आहे. ◆◆◆

## शांत झोप हवीय?

झोप न येणे ही एक अत्यंत त्रासदायक समस्या आहे. जेव्हा सर्व जग सुखाची झोप घेत असते, तेव्हा एकटे जागे राहणे केवळ कंटाळवाणेच नाही, तर आरोग्यासाठीही हानिकारक ठरते; पण तुम्हाला माहीत आहे का? तुमच्या अपुऱ्या झोपेचे कारण शरीरातील मॅग्नेशियमची कमतरता असू शकते. मॅग्नेशियम शरीरातील 'मेलाटोनिन' हार्मोन नियंत्रित करण्यास मदत करते, जे गाढ झोपेसाठी अत्यंत आवश्यक असते. जर तुम्हालाही रात्री वेळेवर झोप येत नसेल, तर खालील तीन पदार्थांचा आहारात समावेश करणे फायदेशीर ठरेल, असे तज्ज्ञ सांगतात.



**केळी :** केळ्यामध्ये पोटॅशियम असते हे सर्वांनाच माहीत आहे; पण त्यात मॅग्नेशियमचे प्रमाणही भरपूर असते. केळ्याचे सेवन केल्यामुळे स्नायूंना आराम मिळतो, ज्यामुळे शरीर शांत होऊन गाढ झोप लागण्यास मदत होते. संध्याकाळच्या वेळी स्नॅक्स म्हणून तुम्ही केळे खाऊ शकता.

**बदाम :** चांगल्या झोपेसाठी दररोज किमान ५ बदाम खाण्याचा सल्ला दिला जातो. बदामामध्ये असलेल्या मॅग्नेशियममुळे मानसिक ताण कमी होतो. अनेकदा अतिविचार किंवा तणावामुळे झोप उडते; अशावेळी बदाम खाणे गुणकारी ठरते.

**भोपळ्याच्या बिया :** जर तुम्ही बऱ्याच काळापासून निद्रानाशाच्या समस्येशी झुंजत असाल, तर भोपळ्याच्या बिया हा एक उत्तम पर्याय आहे. यात असलेल्या मॅग्नेशियममुळे शरीरात 'सेरोटोनिन' हार्मोनची निर्मिती होण्यास मदत होते. हे हार्मोन झोप येण्यासोबतच, तुमचा मूड सुधारण्यासाठी आणि मन प्रसन्न ठेवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते. ◆◆◆



## चक्क बसचे ट्रेनमध्ये रूपांतर!

कल्पना करा की, एक अशी ट्रेन जी तुमच्या घरासमोरून तुम्हाला पिकअप करेल, रस्त्यावरून धावत जवळच्या रेल्वे स्टेशनवर जाईल आणि तिथे अवघ्या काही सेकंदात स्वतःला ट्रेनमध्ये बदलून रुळांवरून धावू लागेल. हे एखाद्या सायन्स फिक्शन सिनेमासारखे वाटत असले, तरी जपानने हे प्रत्यक्षात उतरवले आहे. जपानच्या कायो शहरात 'ड्युएल-मोड व्हीकल' (DMV) नावाचे हे अनोखे वाहन सध्या सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. हे वाहन दिसायला एखाद्या मिनी बससारखे आहे. यात रबरचे टायर आणि स्टीलची चाके अशा दोन्ही व्यवस्था आहेत. जेव्हा हे वाहन रस्त्यावरून धावते, तेव्हा ते सामान्य बसप्रमाणे रबरच्या टायर्सचा वापर करते. रुळांवर येताच, यातील स्टीलची चाके खाली येतात आणि रबरचे टायर वर उचलले जातात. यामुळे ही बस एका हाय-स्पीड ट्रेनमध्ये रूपांतरित होते.

या वाहनाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, बसमधून ट्रेनमध्ये बदलण्यासाठी याला केवळ १५ सेकंद लागतात. एका बटणाच्या क्लिकवर याची चाके बदलली जातात. या ड्युएल-मोड वाहनाचा वेगही थक्क करणारा आहे.

रस्त्यावरील वेग ६० कि.मी. प्रतितास असून, रुळावरील वेग ताशी १०० कि.मी.पेक्षा जास्त आहे. यात एकावेळी २१ ते २३ प्रवासी बसून प्रवास करू शकतात. हे वाहन डिझेल इंजिनवर चालते. हे वाहन 'आसा कोस्ट रेल्वे' या सार्वजनिक कंपनीच्या मालकीचे आहे.

डिसेंबर २०२१ पासून हे वाहन जपानच्या 'शिकोकू' बेटावरील कोची आणि तोकुशिमा प्रांतांदरम्यान धावत आहे. रस्त्यावरून आणि रुळांवरूनही धावण्याच्या क्षमतेमुळे, डोंगराळ आणि दुर्गम भागातील प्रवास आता अत्यंत सोपा आणि सुखकर झाला आहे. पर्यटकांना यातून निसर्गरम्य परिसराचा आनंद घेता येतो. ◆◆◆

## प्राचीन काळात चिमुरड्यांच्या चेहऱ्यावर होते टॅटू

नाईल नदीच्या खोऱ्यात १,४०० वर्षांपूर्वी अवघ्या १८ महिने वयाच्या बालकांच्या चेहऱ्यावर 'टॅटू' (गोंदण) काढले जात असल्याचा खळबळजनक खुलासा पुरातत्त्व शास्त्रज्ञांनी केला आहे. सुदानमध्ये सापडलेल्या जतन केलेल्या मृतदेहांच्या अभ्यासातून ही माहिती समोर आली आहे.

'युनिव्हर्सिटी ऑफ मिसूरी-सेंट लुईस' येथील पुरातत्त्व शास्त्रज्ञ ॲनी ऑस्टिन यांनी याबाबतचे संशोधन केले आहे. संशोधकांनी आधुनिक सुदानमधील तीन ठिकाणांहून १,०४८ जतन केलेल्या मानवी अवशेषांची तपासणी केली. यात सर्व वयोगटातील आणि स्त्री-पुरुषांसह २७ लोकांच्या शरीरावर टॅटूचे पुरावे सापडले. 'कुलुबनार्टी' येथील दफनभूमीतील मृतदेहांचा अभ्यास करण्यासाठी 'इन्फ्रारेड' प्रकाशाचा वापर करण्यात आला. या तंत्रज्ञानामुळे उघड्या



डोळ्यांना न दिसणारे जुने आणि पुसट झालेले टॅटू स्पष्टपणे दिसू शकले.

संशोधनात असे आढळले की, टॅटू असलेल्या बहुतांश व्यक्ती या ११ वर्षांखालील मुले होती. यात सर्वात लहान मूल अवघ्या १८ महिन्यांचे होते. साधारणपणे पुरातन काळात टॅटू हे प्रौढांच्या शरीरावर आढळतात; मात्र मुलांवर टॅटू असणे ही अत्यंत दुर्मीळ बाब आहे. संशोधकांना आणखी एक विशेष गोष्ट आढळली, ती म्हणजे बहुतेकांच्या शरीराऐवजी कपाळ, कानशील, गाल किंवा भुवयांवर टॅटू काढले होते.

एका ३ वर्षांच्या मुलीच्या चेहऱ्यावर तर एका टॅटूवर दुसरा टॅटू गोंदवल्याचे आढळले, ज्यावरून लहान मुलांना वारंवार गोंदवले जात असावे, असे स्पष्ट होते. मानवी संस्कृतीत टॅटू काढण्याची परंपरा खूप जुनी आहे. 'ओत्झी द आईसमॅन' या ५,३०० वर्षांपूर्वीच्या माणसाच्या देहावर ६१ टॅटू आहेत. ५,००० वर्षांपूर्वीच्या इजिप्शियन ममी, २,३०० वर्षांपूर्वीच्या सैबेरियन ममी आणि १,२०० वर्षांपूर्वीच्या पेरुआन ममींमध्येही टॅटू आढळले आहेत. मात्र, सुदानमधील हा शोध लहान मुलांवरील टॅटूमुळे वैशिष्ट्यपूर्ण ठरला आहे. ◆◆◆

## जर्मनीचा 'पुमुकल' ठरला जगातील सर्वात लहान घोडा!

घोडा म्हटलं की, आपल्या डोळ्यांसमोर उंचापुरा, उमदा घोडा उभा राहतो. मात्र, हा घोडा एखाद्या वासराइतका किंवा त्यापेक्षाही लहान आकाराचा आहे. या घोड्यामुळे जर्मनीतील एक छोटेसे शेत लोकांचे खास आकर्षण बनले आहे. हा घोडा इतका लहान आहे की, त्याने 'जगातील सर्वात लहान घोडा' होण्याचा विक्रम आपल्या नावावर केला आहे. या चिमुकल्या घोड्याचे नाव आहे 'पुमुकल.' त्याची उंची फक्त ५२.६ सेंटिमीटर आहे, म्हणजेच तो आपल्या गुडघ्यापर्यंतही नाही. हा घोडा आकारात लहान असला, तरी त्याचे हावभाव आणि वागणे मोठ्या घोड्यांपेक्षा कमी नाही.

'पुमुकल' जर्मनीतील एका फार्मवर त्याची मालकीण कॅरोला वायडेमान यांच्यासोबत राहतो. कॅरोला त्याला प्रेमाने 'स्टार ट्रीटमेंट' देतात, म्हणजेच त्याची काळजी एका सेलिब्रिटीप्रमाणे घेतली जाते. त्याच्या खाण्यापिण्यापासून ते राहण्यापर्यंत सर्व गोष्टींची विशेष काळजी घेतली जाते. विशेष म्हणजे, 'पुमुकल'ला



विक्रम करण्यासाठी पाळले गेले नव्हते. थेरपी घोड्यांसोबत काम करणाऱ्या कॅरोला यांच्या एका मित्राने जेव्हा या अत्यंत लहान तट्टूबद्दल सांगितले, तेव्हा त्या त्याला फार्मवर घेऊन आल्या.

कॅरोला यांच्या मते, 'पुमुकल'चा इतका लहान आकार हा मानवी प्रयत्नांचा नव्हे, तर निसर्गाचा एक अद्भुत चमत्कार आहे. विक्रम मोडणारी उंची असूनही, 'पुमुकल' आळशी जीवन जगत नाही. तो आपला बहुतेक वेळ फार्ममध्ये इकडे-तिकडे फिरून 'काम' करत घालवतो आणि त्यानंतर इतर घोड्यांसोबत शेतात आराम करताना दिसतो. त्याची मैत्री फक्त घोड्यांपुरती मर्यादित नाही. 'पुमुकल' फार्ममधील मांजरीसह इतर प्राण्यांसोबतही खेळताना दिसतो. यामुळेच लोक त्याला मनमिळाऊ आणि कोणत्याही वातावरणात जुळवून घेणारा घोडा मानतात.

'पुमुकल' हा कोणताही शोपीस नसून, तो एका थेरपी घोड्याच्या रूपात काम करतो आणि सगळ्यांचा लाडका साथीदार आहे. 'पुमुकल'च्या या यशामुळे रेकॉर्ड बुक बदलले आहे. त्याने पूर्वीचा विक्रम मोडला आहे. यापूर्वी सर्वात लहान घोड्याचा विक्रम 'बॉम्बेल' नावाच्या घोड्याच्या नावावर होता. पोलंडच्या या घोड्याची उंची ५६.७ सेंटिमीटर होती. 'पुमुकल' 'बॉम्बेल'पेक्षा चार सेंटिमीटरने लहान आहे. ◆◆◆

# आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या महाआरोग्य शिबिरात ५८०० रुग्णांची तपासणी


आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आयोजित शिबिराचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने करण्यात आले.

नगर – आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या माध्यमातून निस्वार्थपणे व सेवाभावी वृत्तीने रुग्णसेवेचे कार्य केले जात आहे. या शिबिराच्या माध्यमातून सेवा करण्याची संधी बोथरा परिवाराला दिली आहे. राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा.यांचा कृपा आशीर्वाद रुग्णांना मिळत असल्याने हजारो रुग्णांचे प्राण आजपर्यंत वाचले आहेत. येथील सर्व डॉक्टर्स, नर्सेस व कर्मचारी अत्यंत तळमळीने रुग्णसेवेचे कार्य करीत आहेत. अहिल्यानगरच्या रुग्णांना पूर्वी मुंबई, पुणे येथे उपचारासाठी रुग्णांना जावे लागत होते. अत्याधुनिक व प्रगतशील तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मिळणाऱ्या उपचार पद्धतीमुळे रुग्णांना मोठा दिलासा मिळत आहे. मुंबई, पुणेच्या धर्तीवर अत्याधुनिक पद्धतीने मिळणारी रुग्णसेवा कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन उद्योजक सुवालाल बोथरा यांनी केले आहे.

राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म. सा. यांच्या १२६ व्या जयंतीनिमित्त स्वर्गीय वैशाली सुबोध बोथरा यांच्या स्मरणार्थ बोथरा ग्रुप व बोथरा परिवार यांच्या वतीने प्लास्टिक सर्जरी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन सुवालाल बोथरा, विनोद बोथरा, प्रमोद बोथरा, प्रकाश बोथरा, सुबोध बोथरा यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून करण्यात आले. याप्रसंगी गौतम चोरडिया, कल्पना चोरडिया, कुमारी आकांक्षा चोरडिया, मोहक बोथरा, कविता बोथरा, संगिता बोथरा, कल्पना बोथरा, नित्या बोथरा, रविना बोथरा, सेजल बोथरा, महिमा बोथरा, सेजेल श्रेयस बोथरा, साक्षी बोथरा, अक्षय भंडारी, जैन सोशल फेडरेशनचे सदस्य डॉ. वसंत कटारिया, संतोष बोथरा, अभय गुगळे, माणकचंद कटारिया, सतीश लोढा, डॉ. आशिष भंडारी, सुभाष मुनोत, वसंत चोपडा, शिबिराचे डॉ. आदित्य दमानी, डॉ. मृदुला मुळे आदी उपस्थित होते.

मोहक बोथरा म्हणाले, सर्वच आजारांवर प्रामुख्याने आरोग्य शिबिरे भरविले जातात. परंतु प्लास्टिक सर्जरी यासारख्या महागड्या उपचार पद्धती असणाऱ्या आजारावर आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे आरोग्य शिबिर घेतले जाते. ही कौतुकास्पद बाब आहे. चेहऱ्यावरील व्रण त्वचेवरील जखमा बरे करण्यासाठी प्लास्टिक सर्जरी सारखे उपाय करावे लागतात. परंतु महागडे उपचार पद्धतीमुळे अनेक रुग्ण प्लास्टिक सर्जरी करण्यापासून वंचित राहतात. या शिबिराच्या माध्यमातून अनेक रुग्णांना दिलासा मिळेल.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले, सुवालाल बोथरा व बोथरा परिवार यांच्या सदभावनेने व सह्योगाने प्लास्टिक सर्जरी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.आनंदऋषीजी म.सा.यांचे स्वप्न साकारण्यासाठी आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे मोठ्या प्रमाणात शिबिरे भरविले जातात.चाळीस वर्षांपूर्वी आरोग्य शिबिरे घेण्यात आली होती.आरोग्य शिबिरांच्या माध्यमातूनच आनंदऋषीजी हॉस्पिटलची निर्मिती झाली आहे.शिबिराच्या माध्यमातून सामाजिक कार्य करण्यासाठी मोठी ऊर्जा मिळत आहे.

डॉ. मृदुला मूळे म्हणाले, स्माईल ट्रेन प्रोजेक्ट सुरू करणारे आनंदऋषीजी हॉस्पिटल हे अहिल्यानगर जिल्ह्यातील पहिलेच सेंटर आहे. स्माईल ट्रेन ही जगभरातील एक अशी संस्था आहे की, या संस्थेमार्फत अनेक शस्त्रक्रिया मोफत केल्या जातात. या प्रोजेक्ट अंतर्गत दुभागलेले ओठ, फाटलेले ओठ तसेच टाळू याविषयीच्या शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत केल्या जातात. या शिबिराचे वैशिष्ट्य असे आहे की, या शिबिरात येणाऱ्या रुग्णांचे दुभंगलेले ओठ, फाटलेले ओठ व टाळू या शस्त्रक्रिया वर्षभर मोफत केल्या जातील. प्लास्टिक सर्जरी शिबिरात लहान मुलांचे जन्मजात हातांच्या समस्या, व्यंग, मधुमेहामुळे होणाऱ्या जुनाट जखमा, पायाच्या जखमा, हातांच्या नसासंबंधीत आजार, चेहऱ्यावरील व्रण आणि लाल ग्रंथी समस्या व कर्करोगाच्या गाठीचे निदान व उपचार पांढरे चट्टे, तोंडाचे व्रण यावर औषध उपचार करण्यात येत आहे. या शिबिराचा गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा.

सूत्रसंचालन डॉ.आशिष भंडारी यांनी केले.तर आभार सतीश लोढा यांनी मानले.

## आरोग्य शिबिरांना मोठा प्रतिसाद

संतोष बोथरा म्हणाले, आनंदऋषीजी हॉस्पिटल येथील आरोग्य शिबीर यांना मोठा प्रतिसाद मिळाला आहे. ऑगस्ट महिन्यातील १६ महाआरोग्य शिबिरांच्या मालिकांच्या समारोप प्रसंगी ५८०० रुग्णांनी शिबिराचा लाभ घेतला आहे. अहिल्यानगर जिल्ह्यासह पाच सहा जिल्ह्यातील रुग्ण मोठ्या विश्वासाने व आत्मीयतेने येथे उपचार घेण्यासाठी येत आहेत. रुग्णांच्या आशीर्वादानेच आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या कार्यात मोठे यश मिळत आहे. वर्धमान महावीर युनिव्हर्सिटी, नेत्रालय विभाग, बीड, तारकपूर येथील ओपीडी, तसेच वर्धमान महावीर स्कूल, नर्सिंग कॉलेज असे विविध सेवा प्रकल्प सुरू आहेत. वर्धमान महावीर स्कूल या शाळेत उच्च दर्जाच्या प्रयोगशाळा असून मुंबई व पुणे धरतीवर नवीन पॅटर्नचा अभ्यासक्रम या शाळेत सुरू करण्यात आला असल्याने गुणवत्तापूर्वक, आधुनिक पद्धतीने, उच्च दर्जाचे शैक्षणिक कार्य पुढे नेण्यासाठी अहिल्यानगर येथे वर्धमान महावीर स्कूल सुरू करण्यात आले आहे.



## गुरुवाणी – ३३
## हृदयाचे नाते तयार व्हावे..

द्वेषातून वैराचा अनुबंध होतो. तो कायम राहिला तर तुम्ही कायम वैरभावाकडेच जाल. कर्म केवळ फळ देते. त्याची जास्त चिंता करायची गरज नाही. आवश्यकता तुम्ही कोणाचे दुश्मन न बनण्याची आहे. वैराचे नाते ९९ लाख ९९ हजार ९९९ जन्म चालू राहते. वैरी और दोस्तो को बुलाना नहीं पडता, वो बिन बुलाये आ ही जाते है. वस्तूशी अनुबंध एकेरी असते. नाते इच्छा असूनही सोडता येत नाही. आज नात्यांचा उत्सव आहे. संकल्प करा की, 'मी कोणाबाबतही कोणाला निगेटिव्ह माहिती देणार नाही. तो व्यक्ती माझ्यासाठी चुकीचा असू शकतो, पण इतरांसाठीही तो तसाच असेल असे नाही'. आज रक्षा बंधन आहे. बहिण भावाचे नाते प्रेमाचे आहे. पण कधी कधी दोघांना एकमेकांविषयी चुकीची माहिती मिळते आणि या नात्यात कटुता येते. त्यामुळे आज राखी बांधताना या गोष्टींपासून कायम अंतर राखण्याचा निर्धार करा. कोणाच्या नात्यात कटुता येईल असे काही करू नका. मंथराची गोष्ट कैकयीने विना विचार करता स्विकारली व पुढे 'रामायण' घडले. मला कैकयी बनायचे नाही, हे निश्चित करा. एकदा तीर्थंकर महावीर विहार करत असताना एका झाडाखाली थांबतात. त्यांनी इंद्रभूती गौतमला जवळ बोलावले आणि म्हणाले, समोर शेतात जो शेतकरी आहे, त्याला जाऊन धर्माचे वरदान देऊन ये. इंद्रभूती गौतमला येताना पाहून शेतकरी खूष झाला. वास्तविक तो इंद्रभूती गौतमला ओळखतही नव्हता. पण त्याचे मार्गदर्शन शेतकऱ्याने आनंदाने स्वीकारले. शेतकऱ्याशी बोलून इंद्रभूती गौतम परत जाऊ लागतो, तेव्हा शेतकरी त्याला अडवतो. तेव्हा इंद्रभूती गौतम सांगतो की मला माझ्या भगवानांनी तुझ्याकडे पाठवले. ज्या भगवान महावीरांना पाहिलेही नाही त्यांच्या प्रती शेतकऱ्याच्या मनात भक्तीभाव निर्माण झाला. इंद्रभूती गौतमने शेतकऱ्याला भगवान दाखवले. त्यांना पाहताच शेतकरी घाबरून आल्या पावली मागे पळत सुटला. सगळेच अचंबित झाले. इंद्रभूती गौतमने प्रभूंना विचारले हे काय झाले? भगवान महावीरांनी सांगितले, तुझ्याशी त्याचे गेल्या जन्मीचे प्रेमाचे नाते आहे, माझ्याशी त्याचे गेल्या जन्मीचे वैर आहे. माझ्याकडून मैत्री आहे पण त्याच्याकडून वैर आहे. तीर्थंकरांनाही मागील जन्माचे वैर चुकले नाही. आज नात्यांचा सण आहे. तुमचे हे नाते ब्राम्ही सुंदरी व भरताचे नाते व्हावे. जेव्हा कोणी कामाला येणार नाही, तेव्हा भाऊ बहिण एकमेकांसाठी धावून येतील. तुमच्यात हृदयाचे, भावना, आत्म्याचे नाते तयार व्हावे.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# यशवंत देवतरसे याचे दोन शोधनिबंध आंतरराष्ट्रीय नियतकालिकांत प्रकाशित



नगर – विळदघाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फार्मसी कॉलेजचा अंतिम वर्षाचा विद्यार्थी यशवंत सचिन देवतरसे याचे दोन शोधनिबंध आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये प्रकाशित झाले आहेत. त्याचा निकोटीन रिप्लेसमेंट थेरपी या विषयावरील पुनरावलोकन निबंध इंटरनॅशनल जर्नल ऑफ फार्मास्युटीकल सायन्सेस या नियतकालिकात प्रसिद्ध झाला आहे. तसेच, तीन सहकाऱ्यांसोबत तयार केलेला हर्बल डी–स्ट्रेस रोल–ऑन या विषयावरील शोधनिबंध हाय टेक्नॉलॉजी लेटर्स या स्कोपस इंडेक्स नियतकालिकात प्रकाशित झाला आहे. या शोधनिबंधांसाठी यशवंत देवतरसे यास महाविद्यालयाचे प्राचार्य, विषयाचे शिक्षक व मार्गदर्शक डॉ. निलेश म्हस्के आणि प्राध्यापक वृंदांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

## १ सप्टेंबरला मंगळागौर महिला उत्सवाचे आयोजन

नगर – येथील मानसी डान्स स्टुडिओच्या वतीने १ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ ते रात्री ९ या वेळेत सावेडीतील माऊली सभागृहात मंगळागौर महिला उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सुरेखा डावरे, अविनाश मिसाळ, भास्कर कोले, डॉ. शाम गणवीर सुवर्णा गणवीर उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमात राष्ट्रीय तबलावादक मास्टर गुलाब नेटके, प्रसिद्ध गायिका गायत्री कुलकर्णी, निलेश महाजन आणि डॉ. शैलेंद्र खंडागळे गायन सादर करणार आहेत. विनायक कसबेकर आणि डॉ. प्राजक्ता सावेडकर निवेदन करणार आहेत.

# आनंदऋषीजी नेत्रालय तारकपूर शाखेच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया व चष्म्यावर ३० सप्टेंबरपर्यंत विशेष सवलत

नगर – जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी नेत्रालयाच्या तारकपूर शाखेला एक वर्ष पूर्ण झाले आहे. या प्रथम वर्धापन दिनानिमित्त तारकपूर शाखेत ३० सप्टेंबर पर्यंत नेत्र तपासणी ओपीडी फीवर ५० टक्के सवलत देण्यात येत आहे. याशिवाय चष्म्यावर १० टक्के सवलत दिली जात आहे, अशी माहिती नेत्रालयाचे प्रशासनाधिकारी आनंद छाजेड यांनी दिली.

आनंदऋषीजी नेत्रालयातील उच्च दर्जाच्या नेत्रोपचार सुविधा जास्तीत जास्त रुग्णांना त्यांच्या जवळच्या परिसरात उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने एक वर्षापूर्वी तारकपूर परिसरात नेत्रालयाची शाखा सुरू करण्यात आली. या शाखेला सावेडी उपनगर परिसरातील नेत्ररुग्ण तसेच बाहेरगावाहून तारकपूर बसस्थानकात येणाऱ्या रुग्णांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. आधुनिक वैद्यकीय सुविधा, तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन आणि रुग्णाभिमुख सेवा यामुळे परिसरातील नागरिकांना मोठा फायदा होत आहे.

तारकपूर शाखेत मेडिकल सुपरिटेंडंट डॉ. प्रतीक कटारिया यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णांना आवश्यक नेत्रतपासणी, निदान व उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. अनुभवी व तज्ज्ञ डॉक्टरांची टीम येथे कार्यरत असून, आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने नेत्र तपासणी व उपचार केले जातात.

प्रथम वर्धापन दिनानिमित्त नेत्र तपासणी व शस्त्रक्रियांवर विशेष सवलती देण्यात येत आहेत. ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेवर १० टक्के सवलत दिली जात आहे. तसेच ज्या रुग्णांनी आनंदऋषीजी नेत्रालयात पहिल्या डोळ्याची शस्त्रक्रिया केली आहे, त्यांना लेसर मोतीबिंदू शस्त्रक्रियेवर २० टक्के सवलत मिळणार आहे. प्रोग्रेसिव्ह चष्म्यांच्या दुसऱ्या जोडीसाठी प्रोग्रेसिव्ह ग्लासेसच्या खरेदीवर २० टक्के सवलत देण्यात येत आहे.

पारदर्शकता, गुणवत्तापूर्ण उपचार आणि वचनबद्ध रुग्णसेवा हे आनंदऋषीजी नेत्रालयाचे वैशिष्ट्य आहे. तारकपूर शाखेत डोळ्यांच्या आरोग्याची संपूर्ण काळजी घेण्यासाठी आवश्यक आधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. नेत्ररुग्णांनी प्रथम वर्धापन दिनानिमित्त आयोजित या विशेष सवलत योजनेचा लाभ घेऊन आपल्या डोळ्यांची तपासणी करून घ्यावी आणि निरोगी व निर्दोष दृष्टीचा आनंद घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ८६८६३०१५१५.



समर्पण चातुर्मासात साधू साध्वींच्या सान्निध्यात रक्षा बंधन साजरा करण्यात आला.

# आनंदतीर्थ समवशरण येथे रक्षाबंधन कार्यक्रम उत्साहात

## बहिण भावात कायम हृदयाचे, प्रेमाचे नाते राहावे : प्रविणऋषीजी महाराज

नगर – बहिण भावाच्या पवित्र नात्याला आपुलकीच्या धाग्याने गुंफणारा रक्षाबंधनाचा सण नारळी पौर्णिमेला उत्साहात साजरा झाला. आनंदधाम परिसरातील आनंद तीर्थ समवशरण येथेही एकाच वेळी शेकडो बहिणींनी आपल्या लाडक्या भाऊरायाला राखी बांधून सण साजरा केला. यावेळी विविध स्पर्धातील विजेते आणि लकी ड्रॉ विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देण्यात आली.

समर्पण चातुर्मासात साजरे झालेले हे अनोखे रक्षा बंधन सर्वांसाठी खूप भावनिक ठरले. गुरूदेवांच्या मार्गदर्शनाखाली सर्व बहिण भावांनी विधिपूर्वक मंत्रोच्चारात रक्षाबंधन अनुष्ठान केले. घेवरची व्यवस्था सौरभ हेमराज बोरा परिवाराने केली होती तर गिफ्ट बॅग समर्पण चातुर्मास कमिटीच्या वतीने देण्यात आल्या. तिर्थेशऋषी महाराज यांनी सुमधुर आवाजात बहिण भावाच्या नात्यावरील गीते म्हणून वातावरण आणखी प्रफुल्लित केले. पुढच्या वर्षी रक्षाबंधन कार्यक्रम आचार्यश्रींच्या जन्मभूमीत करण्याची घोषणा उपाध्याय प्रविणऋषी महाराज यांनी यावेळी केली.

महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषी म.सा., समर्पण चातुर्मासासाठी विराजमान उपाध्याय प्रविणऋषी म.सा., आलोकऋषी म.सा., तिर्थेशऋषी म.सा. सत्यप्रभा म.सा., अमितज्योती म.सा. आदी साधू साध्वींच्या सान्निध्यात हा उत्सव साजरा झाला. समर्पण चातुर्मास २०२६ चे मुख्य लाभार्थी मुंबईचे प्रसिद्ध उद्योगपती आणि अहिल्यानगरचे सुपुत्र तथा तिरूपती बालाजी देवस्थानचे विश्वस्त सौरभ हेमराज बोरा, राखी सौरभ बोरा, प्रमिलाताई हेमराज बोरा, पराग बोरा व बोरा परिवार आहे.

याप्रसंगी समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी, कमिटीचे सदस्य, सौरभ बोरा मित्र परिवार उपस्थित होता.

याप्रसंगी कुंदनऋषी म.सा. यांनी उपस्थितांना मंगल आशिर्वाद दिले. उपाध्याय प्रविणऋषी म.सा. म्हणाले की, आज नात्यांचा उत्सव आहे. संकल्प करा की, मी कोणाबाबतही कोणाला निगेटिव्ह माहिती देणार नाही. तो व्यक्ती माझ्यासाठी चुकीचा असू शकतो, पण इतरांसाठीही तो तसाच असेल असे नाही. बहिण भावाचे नाते प्रेमाचे आहे. पण कधी कधी दोघांना एकमेकांविषयी चुकीची माहिती मिळते आणि या नात्यात कटुता येते. आज राखी बांधताना या गोष्टींपासून कायम दूर राहण्याचा निर्धार करा.

या कार्यक्रमानिमित्त बेस्ट थाली स्पर्धेत वैशाली कटारिया, सोनाली मुनोत, चित्रा मुथा, बेस्ट मेहंदी स्पर्धेत अतुल बोरा व सर्व भगिनी, श्रेया चोरडिया, सिया मुनोत, बेस्ट राखी स्पर्धेत माधवी राहुल बोरा, प्रियांका भंडारी, सोनाली मुनोत तर बेस्ट भाई बहन वेशभूषा स्पर्धेत आनंद फिरोदिया व मोनिका बोरा, गोपी बोरा व दिलीप चंगेडिया, सिया भंडारी व शिवांश भंडारी, मिष्टी शिंगवी व आर्यश शिंगवी यांना बक्षिसे मिळाली. स्पर्धेचे परीक्षण प्रेरणा बायड, दीपा सावला, डॉ. सुरेखा घुगेरिया, मेरू कर्नावट, प्रेरणा कोठारी, वर्षा गोलेचा, मिनल पारख, रिद्धी भंडारी यांनी केले. याशिवाय लकी ड्रॉ द्वारे ११ भाग्यवान विजेत्यांना चांदीची राखी भेट देण्यात आली. अतिशय उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने सर्वांनी रक्षाबंधन कार्यक्रमात सहभाग घेतला. समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा यांनी सर्वांचे स्वागत केले. महामंत्री आदेश चंगेडिया यांनी विविध स्पर्धांचे निकाल वाचन केले.

कार्यक्रमानंतर सौरभ प्रमिलाबाई हेमराज बोरा परिवारातर्फे सर्वांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.

# रक्षाबंधननिमित्त अण्णा हजारे यांना राखी बांधून औक्षण


रक्षाबंधन निमित्त ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांना राखी बांधून औक्षण करताना प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या सहसंचालिका सुप्रभा दीदी. समवेत ब्रह्माकुमारी राजेश्वरीजी, डॉ. दीपक हरके आदी.

नगर – ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांना प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या सहसंचालिका ब्रह्माकुमारी सुप्रभा दीदी यांच्या हस्ते राखी बांधण्यात आली. रक्षाबंधनाच्या या पावन पर्वावर ब्रह्माकुमारी भगिनींनी राळेगणसिद्धी येथे जाऊन अण्णा हजारे यांची भेट घेतली आणि त्यांना पवित्र रक्षासूत्र (राखी) बांधून त्यांचे औक्षण केले.

अण्णा हजारे या प्रसंगी म्हणाले की, रक्षाबंधन हा केवळ एक सण नसून तो बहीण–भावाच्या पवित्र नात्याचा आणि राष्ट्रबंधनाचा संस्कार आहे. आध्यात्मिक कार्याचे कौतुक: अण्णांनी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या समर्पित आणि त्यागी भगिनींमार्फत चालवल्या जाणाऱ्या आध्यात्मिक संस्कार केंद्रांचे मनापासून कौतुक केले. ही आध्यात्मिक केंद्रे समाजाला चुकीच्या मार्गापासून आणि विकृतींपासून दूर ठेवून सन्मार्गावर आणण्याचे मोठे कार्य करत असल्याचे त्यांनी सांगितले.

सुप्रभा दीदी यांनी अण्णा हजारे यांच्या दीर्घायुष्यासाठी आणि उत्तम आरोग्यासाठी ईश्वराकडे प्रार्थना केली व त्यांना ईश्वरीय सौगात (भेटवस्तू) प्रदान केली.

यावेळी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या अहिल्यानगर सेवाकेंद्राच्या संचालिका ब्रह्माकुमारी राजेश्वरीजी आणि १८४ विश्वविक्रम करणारे १ ले भारतीय डॉ. दीपक हरके हे उपस्थित होते.

# द मॅट्रिक्स अकॅडमीमध्ये लॉसाठी ६ सप्टेंबरपासून नवीन बॅच

नगर – येथील मार्केट यार्ड भागात द मॅट्रिक्स अकॅडमीत सुरू झालेल्या कायदा (लॉ) परीक्षेचा अभ्यास करणार्या विद्यार्थ्यांसाठी नुकत्याच सुरू झालेल्या प्रशिक्षण वर्गास विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळत असून, आता येत्या ६ सप्टेंबरपासून नवीन बॅच सुरू करण्यात येत आहे. अशा प्रकारचे प्रशिक्षण देणारा नगरमधील हा एकमेव क्लास असल्याने कायदा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांची या क्लासमध्ये मोठी गर्दी असते, अशी माहिती संचालक गजानन फुंदे यांनी सांगितले.

द मॅट्रिक्स अकॅडमी क्लासमध्ये लॉच्या विद्यार्थ्यांसाठी आवश्यक लॉजिकल रिझनिंग, जनरल नॉलेज, कायद्याचे मुख्य विषय तज्ज्ञ वकिलांकडून शिकवले जातात. अभ्यासक्रमाची अत्यंत उत्कृष्ट तयारी परीक्षार्थीकडून करून घेतली जाते. याचबरोबर द मॅट्रिक्स अकॅडमीमध्ये एलएलबी, एलएलएम, बीबीए, एमबीए, बीसीए, एमसीएच्या प्रवेश परीक्षांसाठी मार्गदर्शन करते, अशी माहिती संचालक फुंदे यांनी दिली.

नोकरीत असलेल्या विद्यार्थ्यांसाठीही या क्लासने लॉसाठी संडे बॅच सुरू केली आहे. दर रविवारी क्लास करून विद्यार्थी आपल्या परीक्षेची योग्य तयारी करू शकतात. विद्यार्थ्यांना वकिली पद्धतीने पॉईंट मांडणे, विषयाची खोली समजावून सांगणे तसेच वकिलीसाठी आवश्यक असलेले गुण शिकविण्यासाठी प्रयत्न केले जातात. अशा विद्यार्थ्यांना हा क्लास उज्ज्वल यशाची हमी देतो, असेही संचालक फुंदे यांनी सांगितले.

कायदा (लॉ) परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या इच्छुक विद्यार्थ्यांनी या क्लासमध्ये नवीन बॅचसाठी आपला प्रवेश निश्चित करून, वरील सर्व वैशिष्ट्यांसह आपली वकिलीची पदवी निश्चित करावी. अधिक माहितीसाठी व प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी ७५१७२४५७७७ व ७८४१०४५७७७ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन फुंदे यांनी केले आहे.

# भनसाळी यांच्या ॲविन्त्री वर्ल्ड ब्रॅन्डला व्हिजनरी इंटरप्रिनियर पुरस्कार प्रदान

नगर – टिव्हिएस टू–व्हिलर क्षेत्रातील २५ वर्षांच्या समृद्ध अनुभवाच्या बळावर स्वतः चा स्वतंत्र ब्रॅन्ड उभा करण्याचे स्वप्न पाहणारे अहिल्यानगरचे उद्योजक अभिनंदन भनसाळी यांच्या जिद्दीला मोठे यश मिळाले आहे. त्यांनी आपल्या अविरत कष्टांच्या जोरावर ॲविन्त्री वर्ल्ड हा ब्रॅन्ड केवळ भारतातच नव्हे, तर परदेशातही यशस्वीपणे नावारूपास आणला आहे. त्यांच्या या प्रेरणादायी आणि धाडसी व्यावसायिक प्रवासाची दखल घेत त्यांना व्हिजनरी इंटरप्रिनियर वेलनेस ॲन्ड सस्टेनेबल मोबिलिटी अवॉर्डने सन्मानित करण्यात आले आहे.

मुंबई येथील पंचतारांकित हॉटेल सहारा येथे पार पडलेल्या इटी नाऊ बिझनेस कन्क्लेव्ह अवॉर्ड २०२६च्या दिमाखदार सोहळ्यात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या कार्यक्रमादरम्यान अभिनंदन भनसाळी यांनी ॲविन्त्री वर्ल्ड हा ब्रॅन्ड यशाच्या शिखरावर पोहोचविताना आलेल्या आव्हानांचा आणि आपल्या प्रेरणादायी प्रवासाचा प्रवास उपस्थितांसमोर मांडला. त्यांच्या या यशामुळे अहिल्यानगरच्या प्रगतीत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.



मुंबई येथील कार्यक्रमात अभिनंदन भनसाळी यांना पुरस्कार प्रदान करताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे.

